म. ग्रं. सं. ठाणे
विषय
व. क्र.

३५६०

७६४.९४
३०।३।८७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

:रावे.

साहित्य शारदा

# आईच्या आठवणी

## भाग सहावा

कथा ३१ ते ३६

म. ग्रं. सं. ठाणे.
अ. क्र. ११८०५ ता. दि.
वि. बा.-मा.

सौ. श्यामला शिरोळकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ७६७९८ वि. बा. वा.
क्रमांक ३५८० नोंद दि. 30/3/09

साहित्य शारदा

वोरा अ‍ॅण्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लि., मुंबई २

# आईच्या आठवणी

. ६ .

श्री : ५१० [ ९–६७ ]

© १९६७
सौ. मङ्गला गाडगीळ

साहित्य शारदा : ६

आवृत्ति पहिली :
शके १८८९, सन १९६७

मूल्य. रु. २

संयोजन :
व
संपादन :
अमरेंद्र गाडगीळ

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.करितां
३, राउंड बिल्डिंग
काळबादेवी, मुंबई २

मुद्रक :
ज. श्री. टिळक
केसरी मुद्रणालय
५६८ नारायण, पुणें २

कंपोज :
महिला सहकारी मुद्रणशाळा
५६८ नारायण, पुणें २

माझ्यावर
जीवनांतील सर्वोच्च संस्कार
करणारे
माझे श्रेष्ठ आप्त, ज्ञानी गुरु
आणि प्रेमळ मार्गदर्शक
**श्री. गोपीनाथ तळवलकर**
यांस ह्या चरित्र-कथा
सादर समर्पण

# यो ज ना

'आईची देणगी' या पुस्तकमालेची योजना माझ्या मनांत साकारली त्याला आतां जवळ जवळ दीड तपाचा काळ लोटला. त्याच सुमारास 'आईच्या आठवणी' हि मनांत घर करून होत्या; परंतु ती संपूर्ण योजना कांहीं त्या वेळीं प्रत्यक्षांत येऊं शकली नाहीं.

आज अनेक वर्षांनंतर 'आईच्या आठवणी' प्रत्यक्ष पुस्तकरूपानें वाचकांच्या हातीं दिल्या जात आहेत. आर्य-हिंदु-भारतीय स्त्री ही साऱ्या मानवजातीला आदर्श आहे. अशा स्त्रीचा वारसा खरा काय आहे तो आमच्या मुलीबाळींना समजावून सांगावा, या उद्देशानें प्राचीन व अर्वाचीन अशा अठ्ठेचाळीस कथांची निवड येथें केलेली आहे. तेजस्विता, सेवा-परायणता, पातिव्रत्य, शीलरक्षणासाठीं आत्मसमर्पण, वात्सल्य, त्यागवृत्ति, सतीत्व इत्यादि विशिष्ट भारतीय स्त्री-आदर्शांच्या चोवीस सद्गुणांचीं उदाहरणें सांगणाऱ्या या कथा आहेत. प्रत्येक सद्गुणासाठीं एक प्राचीन व एक अर्वाचीन अशी कथांची विभागणी केलेली आहे.

सौ. श्यामला शिरोळकर यांनीं योजनेप्रमाणें या कथा क्रमाक्रमानें लिहून दिल्या. श्री. ग. वि. देशपांडे यांनीं त्यांना चित्रांचा साज चढविला. आतां या साऱ्या परिश्रमाचें चीज करणें हें, ज्या किशोरींसाठीं ही योजना तयार झाली, त्यांच्या हातीं आहे.

— संपादक

## भाग सहावा

### सद्गुण : पुण्यजीवन

व्यक्ति : अनसूया — कथा ३१ : पुण्यपुष्पमाला

,, : अहिल्याबाई — कथा ३२ : भारतव्यापी पुण्यस्मृति

### सद्गुण : स्फूर्ति

व्यक्ति : विदुला — कथा ३३ : वीरमाता

,, : ताराबाई — कथा ३४ : स्फूर्तिदेवता

### सद्गुण : दया

व्यक्ति : द्रौपदी — कथा ३५ : आईचें अंतःकरण

,, : सुप्रिया — कथा ३६ : सुप्रियाचा मार्ग

## ६ कथा

नद्यांचीच उपमा देतां येईल. अत्रि ऋषींची भार्या अनसूया त्या साऱ्यांच्या समूहांत उठून दिसेल अगदीं !

लग्न होऊन नुकतीच पतिगृहीं आलेली अनसूया सारी बारा-चौदा वर्षांची होती. तिनें जेव्हां आपल्या गृहाभोंवतीं एकवार फेरी मारली तेव्हां तिला आढळलें कीं, या गृहाच्या पूर्व अंगाला हा विस्तीर्ण यज्ञमंडप आहे. त्या मंडपाच्या मध्यभागीं यज्ञवेदी असून त्यांत सतत पवित्र अग्नीचें वास्तव्य आहे. यज्ञकुंडांभोंवतींची जमीन स्वच्छ, सारवलेली आणि रांगोळी, गुलाल, कुंकू या साधनांनीं सुशोभित केलेली आहे. यज्ञमंडपाला जोडूनच पाठशाळा आहे. त्या पाठशाळेंत कितीतरी ब्रह्मचारी आपल्या पूज्य पतीकडून वेदविद्येची संथा घेत आहेत. पाठशाळेच्या दक्षिण अंगाला स्वयंपाकगृह आहे. त्या स्वयंपाकगृहांत साधींच पण स्वच्छ भांडीं, कंदमुळें, फळें आणि पवित्र जलानें भरलेले घडे आहेत. आणि दर्शनी भागाला अतिथी असलेली छोटीशी पडवी आहे. त्यांत दोन किंवा तीन मृगाजिनें अंथरलेलीं आहेत. आश्रमाभोंवतीं जुई, चांफा, मोगरा, सायली इत्यादींचे वृक्ष आहेत; आश्रमापासून अंतराअंतरावर विद्यार्थ्यांचीं आणि इतर ऋषिमुनींचीं निवासस्थानें आहेत.



"किती सुंदर! साधेंच पण पावित्र्यानें भारलेलें वातावरण!" अनसूयेच्या तोंडून उद्गार निघाले. आणि त्याच क्षणीं त्या वातावरणाशीं ती एकरूप झाली. पतीच्या बरोबरीनें ती तपाचरण, वेदाध्ययन करूं लागली. पतीसाठीं, त्याच्या यज्ञकर्मासाठीं सर्व साहित्य जमा करूं लागली, गोमयानें सारा आश्रम आणि आश्रमाभोंवतालचा आसमंत स्वच्छ राखूं लागली. त्यावर तऱ्हेतऱ्हेच्या रंगावल्या काढून आपलें कौशल्य प्रकट करूं लागली. पाकगृहांत जाऊन चविष्ट पदार्थांची सिद्धता करूं लागली.

"स्त्रीनें एकदां कशांतहि लक्ष घातलें कीं, ती त्यामध्यें पूर्णत्वाला पोहोंचते," अत्रि ऋषि तिच्या स्वभावाचे विविध पैलू पाहून अगदीं कौतुकानें उद्गारले.

"पतिदेव, कोणाविषयीं बोलतां आपण!" अनसूयेनें सहजतेनें प्रश्न केला.

"माझ्या सहधर्मचारिणीविषयीं!" अत्रि तिच्याकडे पहात म्हणाले. आणि तिच्या गोंधळलेल्या चेहऱ्याकडे दृष्टि स्थिर करून तिला सांगूं लागले, "अनसूये, तूं या आश्रमांत पाऊल टाकल्यादिवसापासून मी पहातों आहें, तुझें आचरण इतकें शुद्ध, इतकें पवित्र, इतकें निष्कलंक आहे कीं, त्याला गंगाजलाचीच उपमा देतां येईल."

"पतिदेव, त्या पुण्यपावनी गंगेची आणि माझी कुठून बरोबरी होणार? तिच्या कांठावर उभें राहून नुसतें तिचें दर्शन घेतलें तरी मनांतील सारे वाईट विचार नाहींसे होतात. तिच्या स्वच्छ जलानें स्नान केलें तर साता जन्मांचें पाप नाहींसें होतें. तिच्या जलांतील फक्त एक घोट घेतला तरी अमृत प्याल्याचें समाधान प्राप्त होतें. इतकी ती गंगा श्रेष्ठ." अनसूया नम्रतेनें सांगूं लागली.

पण तिला मध्येंच अडवून अत्रिऋषि म्हणाले,

"साध्वी स्त्रिये, मी तुला मघां म्हटलें तें अगदीं खरें आहे. गंगा जशी साऱ्यांची माउली तशीच तूं या आश्रमवासियांची माउली आहेस. गंगेच्या सान्निध्यांत मनुष्यमात्र आपले कुविचार टाकतो तसेच तुझ्या सान्निध्यांत येणारा आपले कुविचार सोडून देतो. तूं माझ्याप्रमाणें जपतप करून, माझ्या धर्माचेंच आचरण करते आहेस. माझ्याप्रमाणेंच या आश्रमवासियांची काळजी करते आहेस. तूं तपस्विनी, अन्नपूर्णा, थोर माता आहेस."

"पुरे करावा हा विषय!" अनसूया दमून आलेल्या आपल्या पतीची सेवा करण्यांत दंग झाली होती. तिला ही तिची स्तुति मानवली नाहीं. तिनें मान खालीं घातली.



"अनसूये, तुझ्या सामर्थ्याचा आविष्कार तुला लवकरच पहायला मिळेल." अत्रि गंभीर होऊन म्हणाले.

अनसूया आपल्या पतीच्या या बोलण्यावर फारसा विचार करीत बसली नाहीं. तिचें तपाचरण, वेदाध्ययन, पाककृत्य, पतिसेवा पूर्ववत् चालू राहिली. ग्रीष्म ऋतु आला, उन्हाचा दाह सर्वत्र जाणवूं लागला. आश्रमाभोंवतालच्या लतावेली सुकूं लागल्या. जमिनी भेगाळल्या. हिरव्यागार दूर्वा आणि समिधा यांचा तुटवडा

भासूं लागला. पूजेची तयारी करतांना, यज्ञवेदीवर रांगोळी घालतांना अनसूयेच्या कानीं इतर आश्रमवासियांचे उद्गार पडूं लागले: ''आज समिधा आणण्यासाठीं खूप हिंडावें लागलें.''

'' सगळीकडचे झरे पार आटले. आज आमच्या पर्णकुटींत घडाभर सुद्धां पाणी सांठवतां आलें नाहीं.''

अनसूयेनें ताडलें कीं, साऱ्यांची पाण्यासाठीं हाकाटी चालू आहे. ती स्वतः रोज तेथून कोसभर दूर असलेल्या गंगाकिनारीं जाऊन, सचैल स्नान करून, येतांना एक मोठा घडा भरून आणीत असें. दिवसेंदिवस तिलाहि पाणी मिळण्यासाठी त्रास पडूं लागला, पण तिनें आपला क्रम सोडला नाहीं. तहानेनें व्याकूळ झालेले कितीतरी वाटसरू पथिक अत्रि ऋषींच्या आश्रमांत येऊन अनसूयेनें दूरवरून वाहून आणलेल्या गंगाजलानें स्वतःची तृषा भागवूं लागले. कित्येकदां तिला पाण्यासाठीं दोनदोनदां तीनतीनदां वाटेचा वैराण उजाड प्रदेश तुडवीत जावें लागे. परंतु अत्रि ऋषींच्या त्या सहधर्मचारिणीनें आपल्या या सेवाव्रतांत कधीं खंड पडूं दिला नाहीं.

उन्हाळा असा गेला. जातांना साऱ्यांना हैराण करून गेला. आतां वर्षा ऋतूंत तरी साऱ्यांचीं तृषार्त मनें थंड होतील, जमिनी श्रावणाच्या पहिल्या सरींनीं ओल्या भुसभुशीत होतील. थोड्याच काळांत सर्वत्र हिरवीगार सृष्टि बहरेल असें साऱ्यांना वाटलें. पण छे! जों जों दिवस जाऊं लागले, तों तों एकच आकांत उठला, "पाणी! पाणी! पाणी!!" माणसें दीन झालीं. गुरेंढोरें दुबळीं झालीं. अवघ्या सृष्टीचे डोळे खोल गेले. आणि एक दिवस सारे आश्रमवासी आपल्या गुरूंच्या चरणांपाशीं धरणें धरून बसले: "गुरुदेव, येथून आश्रम हलवा. आपण अजून उत्तरेकडे जाऊं, तेथें गंगेचा विस्तृत प्रवाह लागेल. त्या ठिकाणीं आपण आश्रम थाटूं."

" बाळांनो, तुम्ही आंत जाऊन मातेच्या कानीं ही सगळी हकीकत घाला. ती तुमची इच्छा पुरवील."

सगळे आश्रमवासी अनसूयेपाशीं जाऊन उभे राहिले. अनसूया त्यावेळीं एका हरिणशावकाला जवळ घेऊन त्याच्या सुकलेल्या मुखांत घड्यांतील गंगाजल घालीत होती. त्या जलाचे घुटके घेण्यांत तें शावक रमलें होतें आणि उत्तरोत्तर होत असलेला त्याचा टवटवीत चेहरा पाहून अनसूया स्वतःला धन्य समजत होती.

" माते ! " एका शिष्यानें हळू आवाजांत तिला हांक मारली.

" काय बाळा ? " त्याच्याकडे वळून अनसूया उद्गारली.

" माते, आमचें साऱ्यांचें म्हणणें, येथून आश्रम हलवावा आणि उत्तरेकडे न्यावा असें आहे. "

" कां ? कशासाठीं ? "

" माते, पाण्याचें पराकाष्ठेचें दुर्भिक्ष्य झालें आहे. ग्रीष्म, वर्षा ऋतूंत आम्ही जणूं वाळवंटांत राहिलों. सारा आसमंत उजाड झाला आहे. दूर्वा, फुलें, देवभात कांहीं कांहीं मिळत नाहीं या पंचक्रोशींत. शेतें उजाड ! घरें उजाड ! माते, आपण येथून आश्रम हलवूं या; दूर जाऊन राहूं या– गंगातटाकीं ! "

" इतके दिवस वेदघोष, होमहवन, तपाचरण यांनीं पावन झालेली ही भूमि सोडायची ? बाळांनो, हा आश्रम केवळ आपल्या साधनेची वास्तु आहे असें नाहीं. अतिथिअभ्यागतांचें, वनांतील मुक्या प्राण्यांचें हें आश्रयस्थान आहे. आश्रम नसला तर कुठें जातील हीं सारीं ? आपण नसलों तर कोण शांत करील तृष्णा त्यांची ? "

" पण माते, स्वतःचीहि कांहीं सोय बघायला हवी, " एका शिष्यानें धिटाई केली. " पाण्याइतकी आवश्यकता नाहीं दुसरी

कशाची. जिथें पाणी असेल तिथें जाऊं आपण. दोन कोस चालून गेलों तर गंगा नदी......"

"गंगा, गंगा, गंगा ! बाळांनो, ऐका तर," अनसूया गंभीरपणें उद्गारली, "मी तनमनधनानें आजवर शुद्धाचरण केलें असेल, पतिसेवेंत कधीं अंतर पडूं दिलें नसेल, मातेच्या वात्सल्यानें तुमच्यावर प्रेम केलें असेल, माझ्या दारीं वेळींअवेळीं आलेल्या प्राणिमात्रांची क्षुधातृषा शांत केली असेल तर ही तपोभूमि सोडण्याची पाळी माझ्यावर, तुमच्यावर येणार नाहीं. ज्या गंगेचा तुम्हीं ध्यास घेतला आहे, जिच्या कांठीं आश्रम बांधावयाची तुमची इच्छा आहे. ती परमपावनी गंगा माझ्या तप:सामर्थ्याला भुलून येथें अवतरेल!"



आणि अनसूयेचे, त्या पतिव्रता साध्वीचे शब्द खरे झाले. तिच्या इच्छेप्रमाणें गंगेला आपला प्रवाह वदलावा लागला. ती अत्रि ऋषींच्या आश्रमाजवळून खळाळत वाहूं लागली, आणि अनसूयेच्या दिव्यत्वाचा साक्षात्कार साऱ्यांना घडला.

" आपली गुरुपत्नी खरोखरी असामान्य आहे ! " शिष्य म्हणूं लागले.

" मी केलेलें भविष्य खरें ठरलें ! " अत्रि म्हणूं लागले.

आणि गंगेच्या सहवासानें आनंदित झालेली ती तापसी अनसूया अधिकाधिक तेजस्वी, कांतिमान दिसूं लागली. पुन्हां एकवार तिचा आश्रम आणि त्याभोंवतालचा परिसर हिरव्यागार शालूंत वेढला गेला. त्यावर जरीबुट्टयांप्रमाणें रंगीबेरंगी फुलें डोलूं लागलीं. मोर, ससे, हरिणशावकें इतस्ततः हिंडूं लागलीं. अनसूया नित्यकर्मांत गढून जाऊं लागली. तिचें वेदाध्ययन पूर्ण झालें होतें. आतां मधून मधून तीहि आपल्या पतीप्रमाणें आश्रमवासियांना वेदांतील कठीण ऋचा समजावून देऊं लागली. 'जगांतील सर्वश्रेष्ठ, पूजनीया स्त्री' असा तिचा लौकिक सर्वत्र पसरला. पण त्या लौकिकानें ती गर्विष्ठ, कामचुकार झाली नाहीं. पूर्वींइतक्याच तन्मयतेनें तिनें संसारांतील आणि समाजांतील साऱ्या जबाबदाऱ्या पार पाडण्याचें काम उत्साहानें चालविलें होतें.

एक दिवस काय झालें, तीन तेजःपुंज अतिथी तिच्या आश्रमाबाहेर येऊन उभे राहिले. अनसूया त्यावेळीं पाकगृहांत कांहीं पदार्थ रांधीत होती. तिला एका शिष्यानें जाऊन त्या तीन अतिथींच्या आगमनाची वार्ता दिली. अनसूयेला बाहेर जाणें क्रमप्राप्तच होतें. कारण अत्रि त्यावेळीं तीर्थाटन करण्यासाठीं प्रवासाला गेले होते. गृहिणी म्हणून आश्रमांत आलेल्या पाहुण्यांचें उचित स्वागत करणें तिचें काम होतें. ती पुढें झाली आणि तिनें त्या अतिथींचें प्रेमळ शब्दांत स्वागत केलें.

" मी ऋषिपत्नी आहें. आपल्याला बसायला हीं मृगाजिनें मी अंथरलीं आहेत. आपण आसनस्थ व्हावें. विश्रांति घ्यावी आणि भोजनासाठीं येऊन बसावें. मी लवकरच पाकगृहांत सारी सिद्धता करतें."

अनसूयेच्या त्या प्रेमळ शब्दांचें त्या तीन अतिथींनीं स्वागतहि केलें नाहीं आणि त्यांचा अनादरहि केला नाहीं. ते मुकाट्यानें अनसूयेनें निर्देशिलेल्या आसनांवर जाऊन बसले आणि मख्खपणें तिच्याकडे पहात राहिले. अनसूयेला त्या अतिथींचें वागणें जरा विचित्र वाटलें. पण दारीं आलेल्यांचें स्वागत आणि त्यांचा उचित पाहुणचार हें तिचें कर्तव्य होतें. विचारांच्या तंद्रींतच ती पाकगृहांत गेली. 'आजपर्यंत इतके अतिथी येऊन गेले. त्या त्या वेळीं आपल्याजवळ जें जें होतें त्या साहित्यानिशीं आपण त्यांचा पाहुणचार केला. पण आजचा दिवस कांहीं निराळाच दिसतो!' ती मनाशीं म्हणाली.

अनसूयेनें विशेष कष्ट घेऊन सारे पदार्थ तयार केले. अतिथींचीं पानें वाढलीं. त्याभोंवतीं रांगोळी घातली आणि ती त्यांना बोलावण्यासाठीं बाहेर आली.

"भोजनाची सारी सिद्धता आहे. आपण चलावें," अनसूयेनें नम्रपणें त्या तिघांना म्हटलें. तरी ते आपले मख्खपणें बसलेलेच. ते तिच्याकडे बघत होते, पण जागचे हलायला मात्र तयार नव्हते. अनसूयेला तें सारें विचित्र वाटलें. पण गृहिणीचें कर्तव्य तर पार पाडणें जरूर होतें. तिनें पुन्हां म्हटलें,

"आपण तिघांनीं भोजनास चलावें, सारी सिद्धता आहे."

"आम्ही येऊं शकत नाहीं," त्या तिघांपैकीं एकजण रागारागानें म्हणाला.

"कांहीं अपराध घडला का माझ्या हातून?" अतिथींच्या अप्रसन्नतेमुळें अनसूयेनें आणखीच नम्रपणें प्रश्न विचारला.

"अपराध? हो! घडला!" मघांचाच तो अतिथी बोलूं लागला. दारीं आलेल्या पाहुण्यांच्या कांहीं अटी आहेत का, त्यांचीं कांहीं व्रतें आहेत का याची विचारणा केली का ऋषिपत्नीनें? '

" आम्ही भोजन घेऊं शकत नाहीं," दुसरा अतिथी म्हणाला.

" आमचा आपमान झाला आहे," तिसरा उद्गारला.

" अतिथिदेवो भव। अशी आपल्या धर्माची शिकवण आहे," अनसूया बोलूं लागली, " आपण माझे अतिथी म्हणजे साक्षात् देवच आहांत ! "

या तिच्या वाक्यावर त्या तिघांनीं चमकून एकमेकांकडे पाहिलें. अनसूया पुढें म्हणत होती, " आपल्याला संतुष्ट करणें हें एक गृहिणी म्हणून माझें कर्तव्य आहे. आपल्यासाठीं मी भोजनाची सारी सिद्धता केली. आपलीं कांहीं व्रतें असतील तर उरकावींत. कांहीं अट असेल तर मला सांगावी. "

" आहे, आमची अट आहे," एकजण बोलला.

आम्ही व्रतस्थ आहोंत. आमचें सोवळें कडक असतें. आम्हांला कोणत्याहि वस्त्राला स्पर्श झालेलें अन्न चालत नाहीं आम्हांला जेवायला वाढायचें असेल तर अंगावर कोणतेंहि वस्त्र न ठेवतां वाढावें लागतें. तसा आमचा नियम आहे." दुसरा अतिथी अगदी थंडपणानें बोलला.

" त्यामुळें आम्ही आपलें आतिथ्य स्वीकारूं शकत नाहीं." तिसरा अतिथी म्हणाला.

त्या अतिथींच्या या शब्दांनीं अनसूयेचें सर्वांग थरथरूं लागलें. 'अतिथिधर्म का लज्जारक्षण ?' तिच्या मनांत विचारचक्र सुरू झालें. ' मी अत्रि ऋषींची सहधर्मचारिणी. त्यांच्या बरोबरीनें तपाचरण केलें मी. माझ्या या आश्रमाला जीव कीं प्राण मानलें. ऋषींच्या सार्‍या शिष्यांवर वात्सल्याची वृष्टि केली. असंख्य अतिथि-अभ्यागतांना जेवूंखाऊं घातलें. पण असा प्रसंग कधीं आला नव्हता !

अतिथींना प्रसन्न करण्यासाठीं लाजलज्जा सोडायची? या संसारी जीवनांत वाऱ्यानें सुद्धां माझें वस्त्र जरासेंहि बाजूला करण्याचें धाडस केलें नाहीं कीं सहस्ररश्मीनें माझ्या उघड्या अंगावर आपलीं किरणें टाकलीं नाहींत. इथल्या वृक्षवेलींनीं माझीं पूर्वींचीं वस्त्रें जीर्ण होतांच स्वतःच्या हातांनीं मला नवीं वस्त्रें लेवविलीं. या आश्रमांतील साऱ्या शिष्यांनीं माझ्या पदतलांकडे बघत माझ्याशीं बोलण्याचा प्रघात ठेवला. आणि आज नव्यानें आलेले हे अतिथी एवढी धिटाई करतात? विधात्या, गृहिणी-धर्माचें पालन करणाऱ्या माझ्यासारख्या स्त्रीवर हें संकट? गृहिणीधर्म आचरून तर माझें आजपर्यंतचें जीवन कलंकित होईल आणि न आचरेन तर दारीं आलेले हे अतिथी मला शापतील. देवा, कसें करूं मी आता?'

विचार करतां करतां तिची समाधि लागली आणि तिला समजून आलें कीं, ज्या वैकुंठाधिपतीचा आपण धांवा करतों आहोंत तो तर सांप्रत वैकुंठांत नाहीं. ज्या कैलासपतीला आपण आळवितों आहोंत तो कैलासावर नाहीं. ज्या सृष्टिकर्त्याला आपण शरण गेलों आहोंत तो ब्रह्मा ब्रह्मलोकीं नाहीं. मग कुठें गेले हे देवाधिदेव? आणि तिनें ताडलें कीं, आपल्यासमोर बसलेले अतिथी हेच ते ब्रह्मा-विष्णु-महेश.

तिचें विचारचक्र एकदम थांबलें. तिनें आपले नेत्र उघडले. त्यांतून वात्सल्याची दिव्यप्रभा फांकली आणि त्याचे तेजस्वी किरण समोरच्या त्या तिन्ही अतिथींच्या अंगावर पडले मात्र, ते अतिथी मूळच्या रूपांत कोठें शिल्लक होते? त्या दिव्य स्त्रीच्या वात्सल्य-तेजानें दिपलेले ते तिन्ही अतिथी शिशुरूपानें मृगाजिनांवर पडले होते आणि तोंडानें " ट्याहां ट्याहां " करीत रडत होते.

अनसूयेकडे हात झेंपावून तिला ते जणुं म्हणत होते, 'आम्हांला घेना कडेवर उचलून !'



जिची फटफजिती उडवायला ते आले होते ते तिच्या मातृ-पाशांत अडकून पडले. अनसूया झटकन पुढें झाली आणि तिनें त्या तिन्ही बालकांना आपल्या हातांनीं उचलून घेतलें. तिचा हस्तस्पर्श होतांच त्या बालकांनीं आपलीं बालरूपें टाकून दिलीं आणि तिच्या-पुढें त्या जगद्वंद्य त्रिमूर्ती उभ्या राहिल्या, ब्रह्मा-विष्णु-महेश !

"अनसूये, तुझ्या पुण्याचरणानें आम्ही धन्य झालों. तूं आपल्या सामर्थ्यानें गंगेच्या प्रवाहाला मार्ग बदलायला लावलास हें जेव्हां नारदांनीं आम्हांला सांगितलें तेव्हां आमच्या स्त्रियांचा त्यावर विश्वास बसेना. जेव्हां आम्ही त्यांना समजावलें कीं, गंगेच्या जळाहून विशुद्ध असें तिचें जीवन आहे, ती सर्वश्रेष्ठ स्त्री आहे, तेव्हां त्यांना तो स्वतःचा अपमान वाटला. आणि त्यांनीं

तुझ्या पावित्र्याची, निर्मल चारित्र्याची नि अमोघ सामर्थ्याची कठोर परीक्षा घेण्याचा आग्रह धरला. म्हणून आम्ही अतिथि-वेषानें येथें आलों, आणि तुला चमत्कारिक संकटांत टाकलें. हे पुण्यवान् स्त्रिये, तुला आम्ही एक दिव्यमाला देतों. पुण्यपावनी स्त्रीच्या सहवासांत ती सदासतेज राहील." असें, म्हणून त्या तिन्ही देवांनीं एक सुगंधी पुष्पांची, अक्षय टवटवीत रहाणारी माला तिला अर्पण केली. तिची प्रशंसा करीत ते तिघे देवाधिदेव स्वस्थानीं निघून गेले.

दिवस हळू हळू जात होते. अत्रि आपली यात्रा संपवून परत आले होते. त्यांच्या कानीं आपल्या पत्नीची अलौकिक कीर्ति गेली होती. आणि आपलें कुल या स्त्रीनें आपल्या वर्तनानें पावन केलें म्हणून ते स्वतःला धन्य मानीत होते.

पतिसेवा करण्यांत अनसूया एवढीशीहि उणीव ठेवीत नव्हती. पतीचें जीवन तेंच तिचें जीवन होतें. पतीचा आश्रम हेंच तिचें सर्वस्व होतें. आतां वेदाध्ययन. तपाचरण करायचें नव्हतें. ईश्वराच्या वाटेकडे तिचे डोळे लागले होते. गात्रें थकलीं होतीं. केंस पिकले होते. कृश गालांवर सुरकुत्या पसरूं लागल्या होत्या. तरी तें गंगास्नान, पूजेची तयारी, पाकसिद्धी, अतिथि-अभ्यागतांचें स्वागत चुकलें नव्हतें. त्या जीर्ण शरीराच्या पण पवित्राचरण करणाऱ्या स्त्रीची एकच इच्छा होती ! ब्रह्मा-बिष्णु-महेशांनीं दिलेली ती सदासतेज पुष्पमाला कोणातरी सुयोग्य स्त्रीला देऊन टाकावी आणि मगच इहलोकाचा त्याग करावा, पंचत्वांत विलीन व्हायच्या अगोदर अशी एकादी पतिपरायणा, सेवाधर्माचें व्रत घेतलेली श्रेष्ठ स्त्री बघून तिला ती माळ समर्पण करावी. तिचे बारीक झालेले डोळे अशा स्त्रीची वाट पहात होते.

आणि एक दिवस तो सुयोग आला. तिच्या आश्रमांत तीन अतिथी आले. तिची कसोटी पहाण्यासाठीं ? छे ! तिच्यासारख्या परमपावनी स्त्रीच्या दर्शनासाठीं! कोण होते ते अतिथी ?

दोन वल्कलधारी पुरुष आणि त्यांच्यामागून शालीनतेनें आश्रमांत प्रवेशलेली सुंदर वल्कलधारी नारी ! तीं तिघेंहि होतीं राम-लक्ष्मण-सीता.

" ऋषिश्रेष्ठ, हा इक्ष्वाकुकुलोत्पन्न राम तुम्हांला प्रणाम करतो आहे." प्रभु रामचंद्रांनीं अत्रि ऋषींना वंदन केलें. लक्ष्मणानेंहि



आपल्या ज्येष्ठ भ्रात्याचें अनुकरण केलें. सीतेनेंहि आपल्या पतीचें आणि दीराचें अनुकरण केलें आणि मग ती आंतल्या बाजूला अनुसूयेच्या दर्शनासाठीं गेली. वंदन करून तिच्यासमोर बसली. आपल्यासमोरील या सुकुमारीनें पतीसाठीं वैभवाचा, त्याग केला आहे आणि ती पतीबरोबर चौदा वर्षें वनवासांत घालविणार आहे हें कळतांच अनसूयेला समाधान झालें. थरथरत्या हातानें पुण्य-जीवनाची साक्ष असलेली माला तिनें सीतेला अर्पण केली.

* * *

## ३२



# भारतव्यापी पुण्यस्मृति

बालमैत्रिणींनो,

अनसूयेनें दिलेली ती दिव्यमाला सीतामाईनें जन्मभर जतन केली. तिच्या पातिव्रत्याची, पवित्र आचरणाची ती साक्ष होती. तिच्या पुण्यमय जीवनाचें तें मानचिन्ह होतें. पण जगाला त्याची कायकिमत? कोणा तरी हलक्या मनाच्या परिटानें सीतामाईच्या पावित्र्याबद्दल शंका घेतली आणि कर्तव्यदक्ष रामचंद्रांनीं तिचा त्यागकेला. एवढेंच नव्हे तर अश्वमेधाच्या वेळीं तिला बोलावून 'तुझें पावित्र्य तूं सिद्ध कर' असें सांगितलें. तत्क्षणीं धरती दुभंगली आणि सीतामाईला धरतीमातेनें पोटांत घेतलें. सीतामाई गेली आणि तिच्याचबरोबर अक्षय टवटवीत रहाणारी ती मालाहि पण गेली. त्या मालेचा सुगंध मात्र हजारों वर्षें दरवळत पसरत राहिला. त्या सुगंधाच्या वासावरून कित्येक हिंदु नारींनीं स्फूर्ति घेतली. आणि हिंदु भारतीय नारींचें जीवन पुण्यमय, सुखाकारक होऊं लागलें. ईश्वरसेवा, पतिसेवा, कर्तव्य. तत्परता या बाबतींत या देशांत नि संस्कृतींत अनेक आदर्श निर्माण झाले. निरनिराळ्या भागांतून वहाणाऱ्या नद्या जशा आपल्या पुण्यकारक जलानें आसमंतांतील माणसांच्या मनांत चैतन्य उत्पन्न करतात, त्यांची जीवनें फुलवितात, त्याच्यां जीवनांत आनंद निर्माण करतात आणि स्वत:हि

पुढें पुढें वहात जातात, तसें या साऱ्या पुण्यवान स्त्रियांचें आहे. राधा, शबरी, मीरा यांनीं परमेश्वरभक्तीचा आदर्श निर्माण केला तर सावित्री, दमयंती, सुकन्या यांनीं पातिव्रत्याचें एक आगळेंच तेज दाखविलें. आपल्या थोर पूर्वज स्त्रियांनीं भगवद्भक्ति केलेली असो, पतिसेवेंत त्या गढलेल्या असोत, त्यांनीं राज्यें चालविलेलीं असोत वा त्या रणांगणावर शत्रूशीं मुकाबला करण्यांत गुंतलेल्या असोत– एक गोष्ट साऱ्यांच्याच बाबतींत सारखी ! त्यांचें स्वतःचें जीवन निर्मल होतें. आचरण शुद्ध होतें. भारताच्या उच्च आचारविचारांचीं चालतींबोलतीं प्रतीकें म्हणजे या अशा स्त्रिया!



आमच्या लहानपणीं इतिहासाच्या पुस्तकांतून अशाच एका थोर स्त्रीची ओळख आम्हांला झाली. पुस्तकांतील इतर मजकुराबरोबर तिचें एक चित्रहि त्यांत छापलें होतें. भव्य चेहेरा, ठसठशीत नाकडोळे, रुंद कपाळावर आडवी लावलेली कुंकवाची चिरी आणि डोक्यावरून ऐटीनें घेतलेला इरकली लुगड्याचा पदर, ओठ घट्ट मिटलेले आणि हातांत कोयरी घेतलेली.

तिच्या त्या चित्राकडे लक्ष जातांच आम्हांला वाटे ‘ या स्त्रींत कांहीं तरी जगावेगळें आहे खास !’ डोक्यावरून घेतलेला तिचा पदर तिच्या खानदानीपणाची साक्ष देत होता, तर तिच्या रुंद कपाळा-वरील आडवी चिरी तिच्या साध्वीपणाची निशाणी सांगत होता. तिच्या टपोऱ्या डोळ्यांत एकीकडे दयेचा पाझर फुटला होता, तर दुसरीकडे दुष्टाला शासन करण्यासाठीं लागणारी निष्ठुरता सामावली होती. तिचे घट्ट मिटलेले ओठ तिच्या निश्चयी स्वभा-वाचे द्योतक होते, तर तिच्या हातांतील कुंकवाचा करंडा देवा-वरील अपार श्रद्धेचा निदर्शक होता.

“एकाच व्यक्तींत एवढे सगळे गुण ?” तुम्ही मला प्रश्न कराल. पण अशक्य काय आहे त्यांत ? अनसूयेनें नाहीं एकाच वेळीं ईश्वरभक्ति, पतिभक्ति नि सेवाधर्माचें आचरण केलें ? ती तर विजनांत रहात होती. एका दृष्टीनें पहातां तिचें जीवन साधें, सरळ होतें. पण आतां मी जिचें वर्णन चालविलें आहे ती स्त्री विजनांत न रहातां, राजवाड्यांत रहात होती. आश्रमाच्या परिसराएवढेंच तिचें मर्यादित जीवन नव्हतें, तर कित्येक मैलांच्या टापूंत तिच्या जीवनाचा विस्तार झाला होता.

ती स्त्री होती अहिल्याबाई, साध्वी अहिल्याबाई ! संसारांत राहून विरक्त बनलेली, राज्यकारभारांत लक्ष घालूनहि सिंहासनाचा दुरुपयोग न करणारी, राजस्नुषा असूनहि संन्यासिनीसारखी राहणारी आणि कर्तबगार असूनहि मिजासखोर नसलेली ! अन-सूयेप्रमाणेंच तिनें ईश्वरभक्ति केली; आणि मृत्यूनंतरहि पतीची सेवा करतां यावी म्हणून तिनें पतीबरोबर सहगमन करायचें ठर-विलें. अवघें वीस वर्षांचें वय तिचें ! पण निर्धारानें ती सतीचीं वस्त्रें ल्याली. “ मामंजी जातें. आशीर्वाद असूं द्यात; पोरांना

सांभाळा. त्यांना घराचें नांव उज्ज्वल करतील असें शिक्षण द्या" एवढेंच सांगून ती शुभ्रवस्त्रा निघाली.

सासऱ्याला वाटलें, साक्षात् दक्षकन्या सतीच हिच्या रूपानें आपल्यापुढें ठाकली आहे! तो एकदम ओरडला, "सतीऽ सतीऽ, तूं जाऊं नकोस ग. तूं नाहींशी झालीस तर मी कोणाच्या तोंडाकडे बघूं ? मी आतां पिकलें पान झालों आहें. माझा म्हातारपणाचा आधार तूंच आहेस. तूं गेलीस तर या एवढ्या मोठ्या राज्याची व्यवस्था कोण बघणार? तूं गेलीस तर तुझ्या या दोन चिमखड्यांकडे कोण पहाणार?"

कोणाचेंहि अंतःकरण पिळवटून निघेल असे ते आर्त उद्गार त्या अहिल्याबाईच्या सासऱ्यानें, मल्हारराव होळकरांनीं काढले.

"मामंजी, हें सतीचें वाण मी ल्यालें आहें. तें कसें उतरवूं मी अंगावरून आतां ? कशाला मला संसाराच्या मोहांत पाडतां ? मला स्वारीची सेवा करायची आहे त्यांच्यामागें जाऊन!"

"मुली, माझा खंडोजी तर गेलाच. आतां तूंहि जातें म्हणतेस पण तुझ्या रूपानें माझा खंडूच माझ्यासमोर उभा आहे असा भास होतो आहे मला. माझ्या या खंडोजीला राज्याचा भार माझ्यावर टाकून असें अर्ध्यावरून जातां येणार नाहीं. खंडोजी, अरे तूं माझा वारस, या राज्याचा मालक, या प्रजेचा पालक."

डोळे मिटून उभी राहिलेली अहिल्याबाई आपल्या सासऱ्याच्या तोंडून बाहेर पडणारा शोक ऐकत होती. तिच्या नेत्रांतून अश्रु ठिबकत होते. आणि मनांत सांठलेले दुःखाचे कढ दाबण्यासाठीं तिच्या रुंदशा कपाळावर आंठ्यांचें जाळें पसरलें होतें. "मुली, ऐकणार ना माझें म्हाताऱ्याचें ?" अशी विनवणी परत एकदां तिच्या कानीं आली. आणि तिनें सती जाण्याचा आपला निश्चय

बदलला. पण एकदां अंगिकारलेलीं सतीचीं वस्त्रें आणि सतीचें व्रत तिनें आयुष्यभर आचरिलें. सती जाण्यासाठीं उतरविलेला साजशृंगार ती परत कधींच ल्याली नाहीं. कपाळावरील ती आडवी चिरी नाहींशी झाली. हिरवे चुडे जाऊन त्या जागीं अगदींच मिळमिळीत बिनउठावाच्या रंगाची एक एक बांगडी आली. गळ्यांतील सौभाग्यसूचक मंगळसूत्र जाऊन त्या जागीं साध्या तारेंत गांठवलेलीं पोवळ्याची माळ आली. अहिल्याबाईचा पति मृत्युमुखीं पडला त्या वेळींच एक हंसतीबोलती सुवासिनी नाहींशी झाली; आणि एक गंभीर तपस्विनी जन्माला आली. पण अनसूयेसारखें अरण्यांत राहून चालणार नव्हतें तिला. राजवाड्यांत राहून, राज्यकारभारांत लक्ष घालायला लागणार होतें त्या संन्यासिनीला.

रोज सकाळीं ती श्वेतवस्त्रधारिणी थंड पाण्यानें स्नान करीत असे. आणि सर्वसाक्षी प्रभूला आळवून म्हणत असे, "देवा, रामायणकाळांत दगड झालेल्या अहिल्येचा तूं उद्धार केलास. या काळांत हाडामांसानें बनलेल्या या अहिल्येला तूं कधीं उद्धरणार?" देवाला आळवतां आळवतां तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागत. परमेश्वरा, इकडच्या स्वारीला तूं बोलावून घेतलेंस आपल्या पायापाशीं आणि मला केवढ्या दुःखांत लोटलेंस?"

देवाची अशी आळवणी चाललेली असतांनाच कोणीतरी दासी येऊन तिला वर्दी देई,

"थोरले महाराज बोलवीत आहेत."

आपल्या सासऱ्यांचा फार मान ठेवीत असे अहिल्याबाई. त्यांच्या एका बोलावण्यासरशी ती आपल्या महालांतून बाहेर पडत असे. त्या दिवशींहि दासीनें येऊन नुसता निरोप सांगतांच ती लगबगीनें उठली आणि झपाझप पावलें टाकीत मल्हाररावांच्या

अनुक्रम
क्रमांक... ३५६० ....नोंद दि...


सदरेच्या मागें तिच्यासाठीं खास राखून ठेवलेल्या जागीं पडद्याआड येऊन उभी राहिली. ती आलेली समजतांच मल्हारराव उद्‌गारले,

"मुली, तुझ्या इच्छेंप्रमाणें निरनिराळ्या क्षेत्रीं घाट बांधायला हे सगळे कारागीर धाडीन म्हणतों."

"आपणांस मी अज्ञ बालिकेनें काय सांगावें? पण युद्धामुळें रिकामा झालेला खजिना अगोदर भरून काढून मग त्यांतून दान-धर्म, देवदेव यासाठीं रक्कम बाजूला काढावी."

"शाबास, मुली शाबास! मी अगदीं योग्य माणूस शोधून काढलाय राज्य करायला." मल्हाररावाला विलक्षण कौतुक वाटलें आपल्या सुनेचें! त्यानें हळू हळू राज्यांतील जबाबदारीचीं कामें तिच्यावर सोंपवायला सुरुवात केली. आणि थोडक्याच दिवसांत अहिल्याबाईनें राज्यांतील सारावसुली, दरबारचा सारा पत्र-व्यवहार आणि सैन्याची सारी व्यवस्था कशी लावायची तें ज्ञान आत्मसात् केलें.

क्षणोक्षणीं तिच्या गुणांची कसोटी लागायची पाळी येई. तिचा मूळचा स्वभाव धार्मिक! पण राज्यकारभाराच्या जबाब-दारीमुळें कित्येकदां तिला देवाचें नांव घ्यायलासुद्धां फुरसत मिळत नसे. एकदां काय झालें, ती नुकतीच शुचिर्भूत होऊन जपमाळ घेऊन बसली होती. तोंच तिचा विश्वासू सेवक आला आणि म्हणाला, "बाईसाहेब, समदा घात झाला. चंद्रावतच्या रजपुतांनीं सगळ्या राज्यभर बंडाळी माजवली आहे. त्यांना वेगळें राज्य हवें आहे."

"अस्सें? इथें एक स्त्री राज्यकर्ती आहे असें पाहून त्यांना जोर चढला आहे काय? पण त्यांना म्हणावें, मी स्त्री असलें तरी रणांगणाला भीत नाहीं." असे उद्‌गार काढून ती तावडतोब निघाली. ज्या हातांत एरवीं जपमाळ दिसायची तिथें तलवार

तळपूं लागली. ज्या मुखांतून परमेश्वराचें सतत नामस्मरण चालायचें तिथें चंद्रावतच्या रजपुतांचा कशा तऱ्हेनें पाडाव करायचा त्याच्या योजना निघूं लागल्या. जे पाय देवदर्शनासाठीं देवळाकडे वळायचे ते पाय रिकिबींत स्वतःला अडकवून रणांगणाकडे वळले. अन्यायाविरुद्ध जेव्हां स्त्री लढते तेव्हां तिचा आवेश आगळा असतो. शत्रूसमोर ती कालीमाता, रणचंडी बनून अवतरते. अहिल्याबाई तरी त्याला कशी अपवाद असणार? तिनें चंद्रावतच्या बंडखोरांना असा कांहीं धडा शिकविला कीं, तिच्याविरुद्ध ब्र काढायची कुणाची छाती झाली नाहीं पुढें केव्हांहि !

प्रशासनांत गढून गेलेल्या त्या राणी अहिल्याबाईचा रिकामा वेळ दोन गोष्टींत खर्च व्हायचा, एक देवदेवतांचें पूजन आणि दुसरें आपल्या मुलांची देखभाल. सवड सांपडतांच ती निरनिराळ्या यात्रा करायला जाई. आणि तीर्थक्षेत्रांचें दर्शन घेतां घेतांच त्यामधें काय न्यून असेल तें स्वतःच्या पदरच्या पैशानें भरून काढी. काशीविश्वेश्वराचें मंदिर, गंगेचा घाट, वृंदावनांतील सभामंडप, द्वारकेचीं देवळें एक ना दोन भारतांतील साऱ्या प्रसिद्ध तीर्थक्षेत्रांच्या यात्रा करतां करतां तिनें त्या ठिकाणीं कांहीं ना कांहीं बांधकाम उभें केलेंच. यामुळें तिच्या खजिन्यांत अमाप पैसा आहे अशी रघुनाथराव पेशव्यांना कुणकुण लागली. त्या वेळीं ते उत्तरेकडे चढाई करण्यांत दंग होते. त्यांनीं एक दिवस अहिल्याबाईकडे जासूद पाठविला.

"पैशाची जरूरी आहे. आपल्या खजिन्यांतील सारा जास्तीचा पैसा युद्धकार्यासाठीं धाडून द्यावा."

रघुनाथरावाचा हा निरोप त्या जासुदानें मोठ्या गुर्मींत सांगितला. अहिल्यादेवीनें ताडलें कीं, आपण धर्मादाय करतों; जागोजाग देवळें, सभामंडप, घाट बांधतों; पांथस्थांसाठीं धर्मशाळा

विहिरी बांधतों तें या पेशव्याच्या डोळ्यांवर आलें असावें. तिने उलट निरोप धाडला, " माझ्या खजिन्यांत जास्तीची असलेली सर्व रक्कम ही धर्मादायासाठीं ठेवलेली आहे. आपण ब्राह्मण आहांत. वेदपठण करून द्रव्य मागण्याची तयारी असेल तर मी दानाचा संकल्प सोडतें. "

रघुनाथरावाला अहिल्याबाईचा हा जबाव फारच लागला. अगदीं मिरच्या झोंबल्या त्याच्या नाकाला. आपल्या मनगटाच्या जोरावर काय हवें तें मिळवूं आपण, अशी त्याला घमेंड होती. त्या घमेंडींतच त्यानें अहिल्याबाईला निरोप धाडला होता आणि आहिल्याबाईनें त्याला एकाद्या कुशल राज्यकर्तीला शोभेल असें चोख उत्तर दिलें होतें. रघुनाथराव भलता भडक डोक्याचा! त्यानें आपली सेना सज्ज केली आणि तो क्षिप्रा नदी पार करून अहिल्याबाईच्या राज्यावर चाल करून गेला. अहिल्याबाईला आपण हां हां म्हणतां शरण आणूं शकूं अशी त्याची खात्री होती. पण



त्यानें जेव्हां रणांगणावर समोरच्या बाजूला नजर टाकली तेव्हां त्याला दिसलें कीं, एक अति तेजस्वी, शुभ्रवस्त्रधारिणी हातामधें

तलवार घेऊन आपल्या सैन्याचें नेतृत्व करीत आहे. ती स्त्री स्वतः अहिल्याबाई होती. तिच्या पाठोपाठ पांचशें युद्धकलानिपुण स्त्रिया आपल्या मालकिणीच्या इशाऱ्याची वाट पहात उभ्या होत्या. रघुनाथरावानें ती सारी सज्जता पाहिली मात्र; आणि तो मनांत समजला, या स्त्रीला आपण हरवूं शकणार नाहीं. बळजबरीनें तिचा पैसा हिसकावून घेऊं शकणार नाहीं. त्याच्या हातांतील तलवार गळून पडली आणि त्याचे दोन्ही हात आपोआप जोडले गेले. रघुनाथराव पेशव्यांचा सारा कुर्रेबाजपणा, सारी मिजास एका स्त्रीनें आपल्या बाणेदारपणानें उतरविली. कशाच्या जोरावर? तिच्या शुद्ध आचरणामुळेंच केवळ तिला हें शक्य झालें. अहिल्याबाईला रघुनाथराव पेशव्यांशीं कठोरपणें कसें वागतां आलें? देवधर्मासाठीं राखून ठेवलेला पैसा तुमच्या युद्धकार्यासाठीं देतां येणार नाहीं, हें इतक्या छातीठोकपणें कसें सांगतां आलें?

तर, मैत्रिणींनो तिचें साधें पुण्यकारक जीवन, देवावरील तिची श्रद्धा, प्रजेच्या आणि राज्याच्या सुखासाठीं तिनें दाखविलेली तत्परता या साऱ्यांचा मिळून एक पवित्र संगम निर्माण झाला. एक तेजोराशि निर्माण झाली. आणि त्या तेजोराशीपुढें मी मी म्हणणारे अहंमन्य नतमस्तक झाले. आणि जे तिच्यापुढें आधींच नम्र झाले होते ते अधिक नम्र झाले. अहिल्याबाईला स्वतःच्या सुखासाठीं कांहींच नको होतें. तिला हवें होतें तिचें घरदार सुखी झालेलें. तिला हवी होती तिची प्रजा सुखी झालेली. तिला हवें होतें तिचें राज्य भरभराटीला आलेलें. तिला हवी होती देवाच्या द्वारीं सुबत्ता नांदलेली. त्यासाठीं ती जगली. त्यासाठीं तिनें कामाचे डोंगर उपसले. त्यासाठीं तिनें न्यायनिष्ठुरतेनें राज्य चालविलें. आणि त्याचसाठीं तिनें अखेर शस्त्रहि हातीं धरलें. तिच्या सच्छील, धवल चारित्र्याचा

नगारा उत्तर हिंदुस्थानांत दुमदुमूं लागला. 'अहिल्याबाई, इंदूरची अहिल्यादेवी' म्हटलें कीं लोकांचे हात आदरानें आपोआप जोडले जाऊं लागले.

एक दिवस ती दरबारांत बसली असता सेवकानें तिच्यापुढें येऊन तिला मुजरा करून सांगितलें,

"अनंत फंदी म्हणून कोणी शाहीर आले आहेत सरकारांच्या दर्शनाला."

"धाडून दे." अहिल्याबाईनें आपला पदर डोक्यावरून किंचित् पुढें ओढला आणि तितक्यांत तो शाहीर हजर झाला. अहिल्याबाईनें त्याचें उचित स्वागत केलें आणि ती म्हणाली,

"बोला, आपण काय कारण काढून दरबारीं येणें केलेंत?"

"सरकारस्वारींच्या दर्शनाला आलों केवळ!" अनंत फंदी उद्गारला.

"कारण?" अहिल्याबाईनें आपल्या भुंवया उंचावून विचारलें, "कांहीं मदत हवी आहे का?"

"छे, छे, सरकारांच्या भेटींत तो हेतु नाहीं. दर्शन, केवळ आपलें दर्शन करायच्या हेतूनें आलों आहें मी! मी पुण्याचा एक शाहीर. हिंडत फिरत निरनिराळ्या प्रांतीं गेलों. एकदां आपल्या राज्यांत रस्ता चुकला माझा आणि घनदाट अरण्यांत मी सांपडलों. त्या अरण्यांत रहाणाऱ्या भिल्लांनीं मला पाहिलें मात्र. माझें द्रव्य नि माझा मंदील हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला त्यांनीं. त्याच्या तावडींत आयता सांपडलों होतों मी. मला पुरतें लुबाडण्याचा निश्चय झाला होता जणुं त्यांचा! मी गयावया करूं लागलों, परमेश्वराची आण भाकली. पण नाहीं. शेवटीं कसें कोण जाणें माझ्या तोंडीं आपलें पवित्र नांव आलें. मी त्या भिल्लांना

सांगितलें, 'मी तुमच्या राणीकडे, अहिल्यादेवीकडे चाललों आहें. राणीनें मला मुद्दाम बोलावणें धाडलें आहें, मी मोठा शाहीर म्हणून ! आणि तुम्ही लोक अशी वाट आडवतां ?' आणि काय आश्चर्य, सरकारस्वारींचें नांव ऐकतांच त्या भिल्लांची वागणूक एकदम बदलली. त्यांनीं आपल्या हातांतील भाले फेंकून दिले आणि सन्मानानें मला त्यांच्या टोळीच्या नायकाकडे ते घेऊन गेले. त्या नायकानें माझ्या दिमतीला आपलीं दोन माणसें दिलीं आणि तो मला म्हणाला, 'आमचो राणीसाहेब साक्षात् गंगामाय हाय ! लई पुण्यवान् आनो हुशार. सगळ्या राज्याची कशी चलती झाली पहा तिच्या पायगुणानें ! जावा, तुम्ही खुशाल जावा. राणीनें तुम्हाला आवातन दिलें म्हंजे आमचे बी पाव्हणेच हाय तुम्ही. तुमच्या केंसाला बी धका लावणार नाय आमी समदे.' बोलतां बोलतां अनंत फंदीचा गळा दाटून आला. ज्या थोर स्त्रीच्या नुसत्या नामोच्चारानें त्याची सुटका झाली त्या पुण्यवतीला एकदां तरी प्रत्यक्ष डोळ्यांनीं पहावें म्हणूनच तो खरोखरी अहिल्याबाईच्या भेटीला आला होता. आणि तिची एकाद्या तापसीला शोभणारी मूर्ति पाहून त्याचा आदर अधिकच दुणावला. तो पुण्याकडे परतला तो अहिल्याबाईचें गुणगान करीतच.

अशा त्या पुण्यपावनीच्या जीवनांत जेव्हां जेव्हां दुःखाचे कडे कोसळले, तेव्हां तेव्हां तिचें अंतरंग ढवळून निघालें. पतिनिधनाचें दुःख वांट्याला आलेलें ! ज्या मुलांची देखभाल करण्यासाठीं तिनें सती जाण्याचा आपला निश्चय बदलला त्या मुलांनीं तिला काडी-इतकें सुख दिलें नाहीं. तिचा मुलगा माथेफिरू निघाला. ज्या मुला-वर राज्याचा सारा भार सोंपविण्याचीं स्वप्नें तिनें रंगविलीं तो मुलगा स्वतःच तिला भारभूत होऊन बसला. सदरेवरून परत

आल्यावर मालेरावाची समजूत घालायची हा तिचा नित्याचा उद्योग होऊन बसला. "मालेराव, आपण इंदूरचे राजपुत्र, आज उद्यां राज्याची सारी जबाबदारी आपण आपल्या खांद्यावर घ्यायची आहे. असें स्वस्थ बसून कसें चालेल ?"

"माँसाहेब, आम्ही राज्य सांभाळूं, पण आपण त्यांत ढवळाढवळ करतां कामा नये. राज्य चालविणें कांहीं बायकांचें काम नाहीं." त्यानें उद्दामपणें सांगितलें.

"युवराज, उद्यांपासून तुम्ही सदरेवर येत जा. राज्यकारभाराची हळूहळू माहिती करून घ्या." अहिल्याबाईनें आपल्या पुत्राच्या मूर्ख बडबडीकडे दुर्लक्ष करायचें ठरविलें. "थोरल्या महाराजांनीं, आपल्या आजोबांनीं सारावसुली, कायदेकानू, सैन्याची रचना याचें मला ज्ञान करून दिलें. माझ्याकडून तुम्हांलाहि तें करून घेतां येईल."

"नाहीं, नाहीं, आपली कांहीं गरज नाहीं मला. किती झालें तरी राजाचें रक्त आहे या अंगांत. कारभार चालवायला शिकवायला नकोच कुणी मला. गवयाचें पोर तालासुरांत रडतें आणि राजाचें पोर कर्तबगारपणें कारभार करतें. समजलें ?"

दुसऱ्या दिवशीं दरबारांत मालेराव हजर झाला आणि त्यानें जुने हुकूम मोडून त्या जागीं नवे कायदेकानू करायचे ठरविलें.

"माझ्या राज्यांत दगडधोंड्यांचे देव आणि त्यांची पूजा करणारे ते भटुरडे अजिबात नकोत. बांधा सगळ्यांच्या मुसक्या आणि द्या त्यांना फेंकून सातपुड्याच्या डोंगरदऱ्यांत !" मालेरावानें एक हुकूम सोडला.


"माझ्या पदरीं इतकें सैन्य अजिबात नको. कोण मायेचा पूत येतो माझ्या राज्यावर चालून बघतों ना!" असें म्हणत त्यानें आपलें सैन्य शेकड्यांनीं कमी केलें.


ज्या ब्राह्मणवर्गाला अहिल्याबाईनें पूज्य मानलें, ज्या वेद-संपन्नांच्या तोंडून तिनें गीतेचें, रामायण–महाभारताचें सार ऐकलें ते ब्राह्मण तिच्या दारीं येऊन तिची विनवणी करूं लागले, "राणी अहिल्यादेवी, आमच्या आगमनासरशी उठून आपण आम्हांला उत्थापन देत होतां. आणि आज ? आज आम्हीं दर-बारांत प्रवेश केला तर राजें आमच्यावर हुजऱ्ये सोडतात. त्या हुजऱ्यांकडून आमचीं जानवीं हिसकतात. मोठमोठ्या दक्षिणा देऊन आपण आमची संभावना करीत होतां. आम्हांला वर्षासनें बांधून देत होतां; आणि आज आम्हांला दक्षिणा तर नाहींच पण उघड्या पाठीवर आसूड ओढून आमची संभावना केली जात आहे!"

अहिल्याबाईनें तें सारें ऐकून घेतलें, आणि तिच्या तोंडून एवढेंच उद्‌गार बाहेर पडले, "शिव! शिव!" त्या दोन शब्दांमधून तिचें सारें दुःख, वेदना प्रकट झाल्या. आपला मुलगा आपल्या सवाई लोककल्याणकारी होईल ही तिची आशा फोल ठरली. पण निराशा वांट्याला आली तरी तिला ती बाहेर दाखवून चालणार नव्हतें. तिनें आपल्या मनाच्या कपाटांत खोल कुठें तरी सारीं दुःखें दडवून ठेवलीं. आणि आपल्या दिव्य चिरंजिवांच्या हातून तिनें परत राज्यकारभार आपल्या हातीं घेतला. ईश्वराकडे जों जों लक्ष द्यायचें ती मनांत आणी तों तों ती प्रपंचांत अधिकाधिक जखडली जाई. तिची एकुलती एक कन्या मुक्ती तिचा पति अचानक मृत्यु पावला म्हणून सती गेली. तिच्या मुलाचा म्हणजे मालेरावाचाहि दुःखद अंत झाला. आतां सर्वार्थानें अहिल्याबाईचें संसारी जीवन संपलें.

ज्या मुलासाठीं आणि मुलीसाठीं ती सती जायची थांबली तीं मुलें तिच्या डोळ्यांदेखत काळानें ओढून नेलीं. तिचें जीवन अधिक उदास बनलें. वयाच्या विसाव्या वर्षापासून तिला असेंच दुःख भोगावें लागलें. पण तें बाहेर न दाखवतां तिनें एकाद्या पुरुषालाहि लाजवील इतक्या कर्तबगारीनें राज्याचा गाडा हांकला. सासू-सासऱ्यांची सेवा केली. प्रजेचें पुत्रवत् पालन केलें. रघुनाथरावाला निर्भीडपणें उत्तर देऊन आपलें धाष्टर्य प्रकट केलें. विहिरी, तलाव, धर्मशाळा, मंदिरें बांधलीं. अन्नसत्रें, सदावर्तें घातलीं. आणि परमेश्वरावरील आपली अढळ श्रद्धा व्यक्त केली. गंगेच्या पवित्र जलाप्रमाणें तिचें जीवन पुण्यकारक, पावन ठरलें. पावसाळ्यांत ज्याप्रमाणें गंगोदक गढुळतें त्याप्रमाणें दुःखाच्या वर्षावानें तिचें अंतरंग ढवळून गेलें, काळवंडलें. पण तिच्या थोर कर्तृत्वानें ती सर्वांना माहीत झाली ती 'महासाध्वो अहिल्याबाई' 'पुण्यश्लोक अहिल्याबाई' म्हणून.

अहिल्याबाई गेली, पण साऱ्या भारतभर, आसेतुहिमाचल तिचीं पुण्यमय कृत्यें, तिचा पुण्यमय दानधर्म यांतून तिची पुण्यस्मृति सारें भारत व्यापून राहिलेली आहे.



# ३३  वीरमाता

बालमैत्रिणींनो,

तुम्ही शाळेंत कोणकोणते खेळ खेळतां सांगा पाहूं. हुतुतू? लंगडी? खोखो? डॉजबॉल? मला माहीत आहे, या माझ्या प्रश्नानंतर केवढा लांबलचक 'होऽ' तुमच्या तोंडांतून येईल तो! पण मैत्रिणींनो, खेळांत खरी गंमत केव्हां येते माहीत आहे? अंऽ? विचार करून उत्तर द्या हं ..... हरलांत? अग, जेव्हां आपल्या बाजूनें शेंकडों मैत्रिणी प्रोत्साहन द्यायला उभ्या असतात तेव्हां! तुम्ही कधीं आंतरशालेय सामने पहायला जातां का? कसे चुरशीनें खेळले जातात कीं नाहीं? विरुद्ध बाजूचा गडी बाद झाला कीं आपण आपल्या खेळाडूंच्या नावानें जो टाळयांचा कडकडाट करतों कीं बस्स! त्या खेळाडूला स्फुरण चढलेंच म्हणून समजा.

जयाला जेव्हां बाईंनीं खोखोच्या संघामधें घेतलें ना तेव्हां जया जरा घाबरलीच. तशी ती पट्टीची खेळाडू आहे बरें का. प्रतिपक्षाला अशी कांहीं हुलकावण्या देते पळताना... पण पहिल्या दिवशीं काय झालें कुणास ठाऊक. मैदानावरील गर्दी, ते अनोळखी चेहरे, खोखोच्या सामन्यासाठीं आंखलेलें मैदान पाहून जया पार ढेपाळली. आपल्या पायांतली शक्तिच कोणी काढून घेतली असें तिला वाटूं लागलें. तिच्या घशाला कोरड पडली. हाताचे तळवे घामानें ओले झाले. आणि एरवीं आपल्या बडबडीनें सगळयांना हैराण करणारी जया अगदीं चुपचाप कुठेतरी बघत उभी राहिली.

थोडा वेळ तसाच गेला. आणि " कां ग जया ? " असें म्हणत तिच्या अत्रेबाई जयाजवळ आल्या.

" बाई, कसें तरीच होतेंय. " जयानें खरें तें सांगितलें.

" कसेंतरी म्हणजे काय ? " बाईनीं ओळखलें स्वारी या अनोळखी वातावरणाला घाबरली आहे.

" बाई, मला इतकी भीति वाटत्येय. " जयानें कोरडया ओठांवरून आपली जीभ फिरविली. " अग वेडे, एवढी पट्टीची खेळ- णारी तूं आणि असें काय करतेस ? हें बघ, सामना सुरू झाला म्हणजे तुला हें कांऽहीं व्हायचें नाहीं. आपण आपल्या शाळेसाठीं खेळत आहों या भावनेनें न कळत तूं आपलें सर्वस्व पणाला लावून पळशील. जया, तुझ्यावर आमची भिस्त आहे ! " बाईनीं जयाच्या पाठीवर हात ठेवला.

सामना सुरू झाला. जया पटांगणांत उतरली. आणि खरेंच अत्रेबाई म्हणाल्या त्याप्रमाणें ती ईर्ष्येनें पळूं लागली. तिच्या प्रत्येक हुलकावणीसरशी तिच्या मैत्रिणी ओरडत होत्या,

" शाबास जया ! " " बक्ऽअप ! "

मैत्रिणींनो, जयाप्रमाणेंच तुम्हांलाहि असें बावरल्यासारखें झालें असेल कधीं तरी. विशेषत: कोणतीहि परीक्षा जवळ आली कीं आपण थोडया फार घाबरतोंच; त्या वेळीं आईचे अगर बाईचे धीराचे शब्द आपल्याला तारतात; ते आपल्या अंगांत नवचैतन्य संचारवितात. परीक्षेला बसण्यासाठीं उद्युक्त करतात. ही जी आपल्या मनाची तयारी होते त्यालाच आपण स्फूर्ति आली असें म्हणतों; नाहीं का ?

शाळेच्या परीक्षेंत, खेळांत आपलें घाबरणें एक वेळ ठीक आहे; पण रणांगणावर घाबरून चालेल का ? तलवारीला तलवारी

भिडल्या आहेत, सूं सूं आवाज करीत गोळ्या इतस्ततः सुट-ताहेत, लढणाऱ्या वीरांचे मुडदे पडताहेत असें पाहून युद्धभूमीवरून जर कोणी पळून यायला लागला तर तुम्ही चांगलें म्हणाल त्याला?

"छे: कधींच नाहीं. आपण तर त्याला पळपुटा भ्याड म्हणूं." असेंच तुम्ही म्हणाल.

अगदीं असेच उद्गार विदुलेच्या तोंडून निघाले. रागानें तिचा चेहरा लाल झाला होता. हाताच्या मुठी वळल्या गेल्या होत्या. आणि समोर उभ्या असलेल्या संजयला ती म्हणत होती,



"पळपुटचा! भ्याडा! माझ्या पोटीं जन्म घेतलास तो असा नामर्दपणा करण्यासाठीं?"

"अग आई........पण ......" संजय चाचरत बोलूं लागला.

"पण नाहीं नी बीण नाहीं. एक शब्द बोलूं नकोस!" विदुला अधिकच क्रोधायमान झाली.

बालमैत्रिणींनो, विदुला आणि संजयाच्या संभाषणावरून कांहीं बोध होतो तुम्हांला? संजयाचा गुन्हा लक्षांत येतो तुमच्या? ही विदुला कोण कुठली, कळलें का तुम्हांला?

सोवीर देशाची राजमाता होती विदुला. आणि संजय तिचा एकुलता एक पुत्र होता. सोवीर देशाचे महाराज नुकतेच मृत्यु पावले होते आणि संजयावर राज्यकारभाराची सारी जबाबदारी

येऊन पडली होती. संजय जात्याच हळुवार अंतःकरणाचा होता. राज्यकारभार, युद्ध या गोष्टींचा त्याला कंटाळा होता. दरबारांत जाऊन प्रजाहिताकडे लक्ष पुरविण्यापेक्षां आपल्या महालांत बसून देहहित साधण्याकडे त्याचा जास्त कल होता. हातांत तलवार घेऊन रणक्षेत्रावर शत्रूला कंठस्नान घालण्यापेक्षां तो डाव्या हातांत सारंगी घेऊन आपल्या सौधावर बसून ती छेडीत बसणें अधिक पसत करीत असे. जोंपर्यंत थोरले महाराज होते तोंपर्यंत संजयाचा ऐषआराम, विलास सारें कांहीं ठीक होतें. पण थोरले महाराज निवर्तले आणि संजयावर राज्याची सारी जबाबदारी येऊन पडली. तरीसुद्धां संजयाचा जीवनक्रम बदलेना. विदुलेला वैधव्यापेक्षां याचेंच दुःख जास्त होतें. ती गोडीगुलाबीनें संजयला सांगून पाही.

"अरे संजय, राजधानीबाहेरच्या नदीला पाट काढण्यासाठीं कोशांतून किती रक्कम द्यावी असें तुला वाटतें ?"

"आई, तूं आणि प्रधानमंत्री मिळून ठरवा काय तें ! " आपल्याच वयाच्या मित्रांबरोबर द्यूत खेळण्यांत दंग झालेला संजय बोले.

"अरे संजय, दारीं कांहीं याचक आले आहेत. त्यांचें म्हणणें तूं ऐकून घे आणि त्यांना तूं स्वहस्तें दान कर."

"आई, तुम्हीच द्या त्यांना काय द्यायचें तें. मला नाहीं दरिद्री, ओंगळ याचकांसमोर जायला आवडत !" आपली नाजुकसाजुक छबी न्याहाळण्यांत दंग झालेला संजय उत्तर देई.

विदुला आपल्या कर्तव्यविन्मुख मुलाच्या वागणुकीनें खिन्न होऊन आपल्या महालांत परते. 'कधीं समजणार या मुलाला स्वतःची जबाबदारी ? कधीं समजणार या मुलाला राजाचें कर्तव्य ? कधीं लक्षांत येणार याच्या क्षत्रियधर्म ? ' विदुलेची विचारमालिका

सुरू होई. आणि नकळत तिच्या डोळ्यांत अश्रु जमा होत. महालांत लावलेल्या आपल्या पतीच्या भव्य चित्राकडे तिची नजर जाई.

'किती रुबाबदार होते थोरले महाराज!' तिच्या साहजिक मनांत येई. थोरल्या महाराजांची उंचीपुरी धष्टपुष्ट देहयष्टी, करारी चेहरा पहाणाऱ्याच्या मनांत चांगलाच दबदबा निर्माण करीत असे. सौवीर महाराजांनीं आपल्या पराक्रमानें, कर्तृत्वानें आजूबाजूच्या राजांवर चांगलीच जरब वसविली होती. बाह्यत: रागीट दिसणारे महाराज अंत:करणानें मात्र अतिशय प्रेमळ होते. विदुलेला आणि छोटया संजयाला त्यांनीं अतिशय सुखांत ठेवलें होतें. संजयाचे तर ते इतके लाड करीत कीं राणी विदुला शेवटीं आपल्या पतीला म्हणे,

"महाराज, या लाडांनीं संजय बिघडून जाईल बरें!"

"महाराणी, माझ्या संजयाबद्दल तुम्ही उगीच चिंता करतां! अहो, किती झालें तरी माझा मुलगा आहे तो. खऱ्या क्षत्रियाचें रक्त त्याच्या अंगीं खेळतें आहे. माझ्या लाडांनीं तो बिघडेल असा सुतराम् संभव नाहीं."

"केवढी आशा होती महाराज संजयाबद्दल तुम्हांला! आपला संजय आपल्यासारखाच कर्तबगार राजा होईल आणि सौवीर राजवंशाची मान उंच करील असें वाटायचें ना तुम्हांला? महाराज, महाराज, आज तुम्ही माझ्या जागीं असतांत तर तुम्हांला संजयाबद्दल काय वाटलें असतें?" राजमाता विदुला हताशपणें आपल्या पतीच्या तसबिरीला प्रश्न करीत होती. "आळशासारखा झोंपून राहणारा, राजदरबारांत कधींमधीं जाणारा, द्यूत खेळण्यांत दंग असणारा संजय कसला राजधर्म आचरतोय?" राजमातेनें प्रश्न केला. आणि तिला संजयाच्या लहानपणींचा दुसरा प्रसंग आठवला.

एकदां राजवाड्यांत एक ज्योतिषी आला होता. थोरल्या महाराजांनीं कौतुकानें मांडीवर बसलेल्या संजयाचा हात ज्योतिषापुढें धरला. ज्योतिषानें बराच वेळ न्याहाळलें आणि सांगितलें,

"महाराज, युवराजांना गादी मिळाल्यावर पहिले कांहीं दिवस अपयश येईल. पण पुढें कर्तबगार राजे म्हणून ते प्रसिद्धीला येतील."

आज विदुलेला तेच शब्द आठवत होते. संजयाला "भ्याड, नामर्द," म्हणतांना विदुलेच्या नजरेसमोर संजयाचा सारा जीवनपट सरकत होता. संजयाच्या गैरहिशेबी, अव्यवस्थित कारभाराचा फायदा घेऊन सिंधुदेशच्या राजानें सौवीरवर चढाई केली होती. शत्रुसैन्यानें अकस्मात हल्ला केला होता. हल्ला झाला त्यावेळीं संजय आपल्या पत्नीबरोबर–शुक्लेबरोबर सारीपाट खेळण्यांत दंग झाला होता.

"महाराज, महाराज, घात झाला. सिंधुनरेशानें आपल्यावर हल्ला केला आहे. शत्रूनें केवढे हत्तीदळ, पायदळ आणलें आहे. स्वत: सिंधुनरेश अंबारींत बसून राजधानीवर चाल करून येत आहेत." एका दूतानें घाबऱ्या घाबऱ्या येऊन संजयाला ही बातमी सांगितली. ऐकलेल्या वार्तेनें संजयाची पुरतीच गाळण उडाली. तो उठला पण भीतीनें पांढराफटक होऊन. त्यानें युद्धावर जाण्यास शिरस्त्राण घातलें पण थरथरत्या हातानेंच. घोड्यावर आरूढ होण्यासाठीं तो पागेच्या द्वारापाशीं जाऊन उभा राहिला पण लटपटत्या पायांनींच.

"बापरे! युद्ध करायचें? रणांगणावर जाऊन?" त्याची पत्नी पंचारतीनें त्याला ओवाळीत असतांना संजयाच्या मनांत भीति ठाण मांडून बसली होती. त्याला सेनेसमोर आलेला पहातांच

सेनापतीनें आणि साऱ्या योद्धयांनीं त्याच्या नांवाचा जयजयकार केला–

" संजय महाराजांचा विजय असो ! "

' कसला विजय आणि कसलें काय ? ' संजय स्वतःशींच विचार करूं लागला. ' म्हणे संजय महाराजांचा विजय असो ! तरी सगळ्यांना माहीत आहे मला लढाई आवडत नाहीं. तो तलवारींचा खणखणाट आणि तीं तऱ्हेतऱ्हेचीं अस्त्रें अन् तीं गदायुद्धें, मल्लयुद्धें. बापरे, बापरे, कसला कठिण प्रसंग आणलास माझ्यावर देवा ! एवढ्यासाठीं का मला जन्माला घातलेंस? आतां महालांतील तो ऐषआराम, तें द्यूत खेळणें, तो शुक्लेचा मधुर सहवास – सारें सारें संपणार ; आतां गांठ आहे बेहोश होऊन चढाई करून आलेल्या शत्रूशीं .....पहा ......पहा कसे इर्षेनें लढायला तयार झाले आहेत एकएक ! अंगावर घाव बसतील तेव्हां समजेल. देवा, मला सुद्धां जखमा होतील का रे ? कोणी सांगावें, रक्ताच्या महानदींत माझा निष्प्राण देह क्षणांत कोसळेलसुद्धां ! निष्प्राण देह ? अरे बापरे... म्हणजे आपण मरणार ! बापरे, काय भयानक असतें मरण ! '

युद्धभूमीवर ठाकलेल्या संजयाच्या मनांत हे विचार चालले होते. संजयाचा सेनापति आपल्या सैन्याची रचना करण्यांत गर्क होता. सैनिक धन्याच्या हुकुमाची वाट पहात होते.

' आपण गुपचूप पळून गेलों तर ? ' संजयाच्या मनांत विचार आला. त्यानें आजूबाजूला वळून पाहिलें. त्याच्याकडे कोणाचें फारसें लक्ष नव्हतें. संजयाला मरणाची भीति वाटत होती. त्यानें घोड्याला टांच दिली आणि घोडा मागें फिरवून तो राजवाड्याकडे निघून आला.

राजमाता विदुला संजयाचीच काळजी करीत आपल्या महालांत बसली होती. आणि मनांतल्या मनांत ती परमेश्वराला आळवीत होती, " परमेश्वरा, माझा संजय आज पहिल्यांदाच युद्धभूमीवर गेला आहे. तो वृत्तीनें अति कोमल आहे. पण रणांगणावर तरी तो पराक्रम गाजवूं दे. विजयी होऊन परत येऊं दे."

"राजमाता, सौवीरमहाराज युद्धभूमीवरून परतले आहेत."

"काऽयऽ? संजय परतला आहे? विदुला जवळ जवळ किंचाळलीच. आणि आपण काय करतो आहोंत याचें भान न राहून ती तरातरा संजयाच्या महालांत गेली.

"संजऽय!" तिनें कठोरपणें हांक मारली. आईच्या हांके सरशी संजय मंचकावरून उठला आणि आईच्या पायावर डोकें ठेवून मोठमोठ्यानें रडायला लागला.

"रडायला काय झालें?" विदुलेचा कठोरपणा अजूनहि कमी झाला नव्हता.

"आई, मला फार भीति वाटते रणांगणावर." संजय बोलूं लागला.

"भ्याड! नामर्द! तुला असें सांगतांना कांहींच कशी लाज वाटत नाहीं?"

"आई, मला खरेंच ग मरणाचें भय वाटतें!"

"मूर्खा! तूं क्षत्रिय घराण्यांत जन्माला येऊनहि अशी भाषा करतोस? सौवीर महाराजांच्या आशाआकांक्षांचा चुराडा करतांना तुला लाज कशी नाहीं वाटत?" विदुला रागानें थरथरत होती.

"आई, स्वतःचा जीव कोणालाहि प्रिय असतो."

"चूप संजय! तुझ्या बेजबाबदारपणाची मला 'अत्यंत चीड आली आहे. अरे, स्वतःचा जीव वांचवायला थोडाच तूं

जन्मला आहेस? या राजवंशांतील राजेमहाराजांनीं स्वतःच्या जिवावर उदार होऊन शत्रूशीं सामना दिलेला आहे. पुत्राप्रमाणें प्रजेचें रक्षण केलें आहे. स्वतःच्या कर्तबगारीनें अपार ऐश्वर्य मिळविलें आहे. तूं, तूं काय केलेंस यांतलें?"

"आई ऽ अग, मला नाहीं आवडत या गोष्टी!"

"आवडत नाहींत? कुपुत्रा, स्वतःला राज्याभिषेक करून घ्यायला बरा आवडला तुला? मऊ गाद्यागिरद्यांवर लोळणें, द्यूत-सारिपाट खेळणें, सुखविलासांत दंग रहाणें हा खरा राजधर्म नाहीं हें मी तुला वारंवार बजावीत होतें."

"पण आई ऽ"

"मला तुझ्याकडून आई म्हणवून घ्यायची देखील लाज वाटते. माझा खरा मुलगा शोभेल तोच, जो खऱ्या राजधर्माचें, क्षात्रधर्माचें पालन करतो. तो एक तर रणांगणावरून विजयी होऊन परततो किंवा धारातीर्थीं मरण पावतो."

"किती कठोर हृदयाची आहेस, आई तूं! अग, मी तुझा एकुलता एक पुत्र! माझ्या मरणानें तुला किती दुःख होईल हा विचार मनांत आणूनच मी रणांगणावरून परत फिरलों."

"आणि भ्याडासारखा कोपऱ्यांत तोंड लपवून रडत बसलों, असेंच ना?" विदुलेचा संताप अनावर झाला.

"आई, मी जिवंत रहाण्यानें तुला कांहींच का सुख होणार नाहीं?"

"संजया, माझ्या सुखाची तूं कां चिंता करतोस? मला थोरल्या महाराजांनीं आजपर्यंत फुलासारखें अलगद ठेवलें होतें. आतां मात्र तुझ्या भ्याडपणानें माझ्या सुखाला गालबोट लागणार आहे. संजया, उद्यां सिंधुदेशचा राजा या राजधानींत प्रवेश करील.

त्याच्या स्वागतासाठीं खालीं मान घालून तूं जाशील. शत्रुपक्षावर विजय मिळविल्याच्या नादांत तो मला आणि शुक्लेला दासीवटकीप्रमाणें वागवील. करवते का तुला आमच्या सुखाची कल्पना? अरे, जो राजा प्रजाहिताकडे लक्ष न देतां स्वतःच्या काळजींत मग्न राहतो तो जगला काय आणि मेला काय, दोन्ही सारखेंच!

"आई, माझें हे इतकें सुंदर शरीर मी मेल्यावर कोल्ह्याकुत्र्याचें भक्ष्य बनेल. आवडेल तुला?" संजयाला अजूनहि आशा होती आई आपल्याला राजवाड्यांत रहा म्हणेल म्हणून.

पण विदुला कांहीं लेचीपेची माता नव्हती. आपल्या मुलाला कर्तव्यतत्पर बनवायला हाच क्षण योग्य असें तिला कळून चुकलें होतें. तिनें रणक्षेत्राला पाठ दाखवून पळून आलेल्या आपल्या पुत्राची खूप निर्भर्त्सना केली. पण तरीहि संजय रणांत जायचें नांव काढीना. तेव्हां ती समजावणीच्या स्वरांत त्याच्याशीं बोलूं लागली.

"संजया, मी तुझी आई आहें. आपल्या मुलावर वात्सल्याची वृष्टि करणें हें प्रत्येक आईचें कर्तव्य आहे. आई नेहमींच आपल्या पुत्राचें मंगल चिंतिते. पण जर कोणतीहि आई आपल्या भित्र्या, अयशस्वी मुलावर प्रेमाचा वर्षाव करूं लागली तर ती 'आई' या नात्याला पात्र ठरत नाहीं. संजया, तूं क्षत्रिय आहेस. क्षात्रधर्माचें पालन करण्यांतच तुझें हित आहे, यश आहे. क्षत्रियानें सदा तेजस्वी आचरण केलें पाहिजे. मला माहीत आहे, तुला माझें बोलणें आवडत नसणार. पण खरें सांगतें संजया, माझ्या बोलण्याप्रमाणें तूं वागलास तर त्यांतच तुझें हित आहे, ऊठ. असला भ्याडपणा सोडून दे. रणांगणावरून पळून यायची जी दुर्बुद्धि तुला झाली आहे ती टाकून दे. मग तुझ्या लक्षांत येईल कीं युद्ध करण्यासाठीं, शत्रूला पराजित करण्यासाठींच तुझा जन्म झाला आहे. शत्रूला

शरण जाऊन जीवन जगण्यांत कसला आला आहे पुरुषार्थ? त्यापेक्षां रणांगणावर मरण पत्करणें हेंच खऱ्या वीराचें लक्षण आहे. जा, तूं युद्धावर जाण्याचा निर्धार कर. 'मी शत्रूशीं प्राणपणानें लढेन आणि विजयी होईन' असा निश्चय कर. तूं शूर आहेस. पराक्रमी आहेस. बेधडक शत्रूवर चालून जा. त्याला आपल्या राज्यांतून पिटाळून लाव. प्रजेला शत्रूच्या जाचांतून मुक्त कर. आणि साऱ्या जगाला माहीत होऊं दे, सौवीर देशचे राजे आपली कुलपरंपरा कशी राखतात तें."

विदुलेच्या या तेजस्वी बोलण्यानें संजय अंतर्बाह्य बदलला. क्षणापूर्वी मृदु असणारा त्याचा चेहरा वज्रासारखा कठोर झाला. कांहीं क्षणापूर्वी रणांगणांतून मरणाच्या भीतीनें पळून आलेला संजय शत्रूला मारण्यासाठीं सिद्ध झाला. त्याचे बाहु स्फुरण पावूं लागले. मन उल्हसित, निश्चयी बनलें. मुद्रा करारी दिसूं लागली. तो उठला आणि ठामपणें आईला म्हणाला,

"आई, वीरमाता म्हणून यापुढें तुझा लौकिक होईल असेंच वर्तन मी करीन. मी सिंधुनरेशाचा हल्ला परतवून लावण्यासाठीं जातों. मला आशीर्वाद दे कीं मी विजयी होऊन परत येईन."

विदुलेचे डोळे पाण्यानें डबडबले. संजयाच्या मनांत झालेला बदल पाहून तिला धन्यता वाटली. आनंद वाटला. अभिमानहि वाटला त्याबद्दल तिला.

संजय जायला निघाला. विदुलेनें त्याला पहिला आशीर्वाद दिला तो "तुझें वर्तन क्षत्रियधर्माला साजेसें होवो" असा; आणि नंतर तिनें त्याला "यशवंत हो" असा आशीर्वाद दिला.

संजय विदुलेचा निरोप घेऊं लागला तेव्हां त्याची पत्नी पुढें येऊन म्हणाली,

"थांबा, पतिदेव, रणांत आपल्या हातून शत्रूचा निःपात होऊं द." पंचारती घेऊन ती उभी होती. पतीविषयींच्या अभिमानानें तिचाहि चेहरा उजळून निघाला. तिनें साश्रु नयनांनीं पतीच्या भालप्रदेशीं कुंकुमतिलक लावला. तबकांतील निरांजनानें त्यास ओवाळलें.



"शुक्ले, या ज्योतीला साक्ष ठेवून मी प्रतिज्ञा करतों कीं रणांत शत्रूचा पुरता निःपात करीन किंवा शत्रूशीं लढतां लढतां देह तरी ठेवीन, पण अयशस्वी तोंड घेऊन रणांगणावरून परत फिरणार नाहीं."

संजय पुन्हां रणांगणावर येऊन उपस्थित झाला. त्यावेळेचा त्याचा तो रुद्रभीषण आवेश पाहून त्याच्या साऱ्या सैनिकांना स्फुरण चढलें. त्यांचेहि बाहु शत्रूशीं दोन हात करायला सज्ज झाले. ज्योतीनें ज्योत लागावी त्याप्रमाणें एकाच्या स्फूर्तीनें अनेकांना स्फूर्ति दिली. विदुलानें स्फूर्तिदेवतेचें काम चोख बजावलें. तिच्या तेजस्वी वाणीनें संजयामध्यें उत्साहाचा, वीरश्रीचा संचार झाला. आणि त्याच्या वीरश्रीयुक्त हालचालींनीं साऱ्या सैन्यांत उत्साह निर्माण झाला.

सिंधुनरेशाला संजयाची जी माहिती कळली होती ती म्हणजे "एक दुबळा, भित्रा, विलासी राजा" म्हणून. पण त्याच्यासमोर आतां जो संजय उभा ठाकला होता तो साक्षात् रुद्राचा अवतार होता. सिंधुनरेश अंबारींतून खालीं उतरला. त्यानें संजयाला गदा-युद्धाचें आव्हान दिलें. संजयानें हातांतील धनुष्यबाण टाकून दिला आणि हातांत गदा धारण केली. आजूबाजूला शेंकडों वीरांचे देह धरणीवर कोसळत होते. घोड्यांच्या टापांमुळें, रथांमुळें, पायदळा-मुळें सारें वातावरण घुसळून निघत होतें. धुळीनें भरून गेलें होतें. योद्ध्यांच्या आवेशपूर्ण गर्जना, शंखनिनाद, धनुष्यांचे टणत्कार या साऱ्या धुमश्चक्रींत संजय आणि सिंधुनरेश एकमेकांना भिडले. दोघेंहि ईर्षेनें लढत होते. संजयाचा चेहरा श्रमानें, रागानें लाली-लाल झाला होता. त्याच्या कानांत त्याच्या तेजस्वी आईचे –



वीरमाता विदुलेचे शब्द घुमत होते. तिनें दिलेली स्फूर्तीची शिदोरी त्याला त्या भयानक मृत्युकुंडावर पुरत होती. विदुलेनें आपलें

कर्तव्य बजावलें. संजयहि आपलें कर्तव्य बजावण्याची पराकाष्ठा करीत होता.

अखेर शेवटीं संजयानें लढाई जिकली. सिंधुनरेशाला त्यानें गदायुद्धांत हरविलें. सिंधुनरेशानें आपला पराभव कबूल केला. संजयासमोर त्यानें आपला मुकुट खालीं काढून ठेवला.

"संजया, मी तुझ्या राज्यांत अन्यायानें घुसलों. तुझें राज्य गिळंकृत करण्याचा प्रयत्न केला. 'पण तुझ्या शौर्यापुढें, क्षात्रतेजा-पुढें मला हार पत्करावी लागली." सिंधुनरेश क्षमेची याचना करीत होता.

संजयानें भलीमोठी खंडणी घेऊन त्याला जीवदान देऊन सोडून दिलें. युद्धभूमीवरून संजय महाराजांचा जयजयकार करीतच सारें सैन्य राजवाड्याच्या रोखानें निघालें. विदुलेनें ओळखलें, आपला संजय यशस्वी होऊन परतला आहे.

वीरमाता आपल्या वीरपुत्राचें यथोचित स्वागत करण्या-साठीं भरल्या अंतःकरणानें सज्ज होती.

* * *

# ३४ स्फूर्तिदेवता

"बाईसाहेब. आशीर्वाद द्या या ताराला" असें म्हणत एक खानदानी, गौरवर्णी, तेजस्वी चेहेऱ्याची स्त्री महाराणी येसूबाई-समोर वांकली. महाराणी येसूबाईनें आपल्या दोन्ही हातानीं धरून तिला उठविलें आणि आपल्या पोटाशीं धरलें.



"तारू, माझे आशीर्वाद आहेत तुला. सुखानें जा. माझी काळजी करूं नकोस. थोरल्या महाराजांच्या कृपेनें खानाच्या या वेढ्यांतून माझी नी बाळराजांची...." पण हें बोलतांना पुढचे शब्द उच्चारतां आले नाहींत महाराणी येसूबाईला. तिचा कंठ दाटून आला. डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. आणि त्या अश्रुजलानें ताराबाईचें मस्तक अधिकच भणभणूं लागलें. तिच्या डोळ्यांत अंगार फुलला.

"बाई, तुमचें कपाळ पांढरें करणाऱ्या त्या दुष्ट, क्रूर औरंग-जेबाला मराठ्यांचें पाणी दाखविल्याशिवाय राहयची नाहीं मी!"

तारूचा म्हणजेच राजाराम-पत्नी ताराबाईचा चेहरा रागानें लालीलाल झाला. " बाई, खरें सांगतें, ज्या क्षणीं त्या दुरात्म्यानें संभाजी राजांचा वध केल्याची कुवार्ता माझ्या कानांवर आली त्या क्षणींच वाटलें कीं, आत्तां जाऊन त्या दिल्लीश्वराचें सिंहासन फोडावें, त्याचें नरडें घोटावें ......दुष्ट! नीच ! कपटकारस्थानी!" ताराबाईच्या मुखांतून शब्दरूपी अंगार बाहेर पडूं लागला.

"बाई ग, भावोजींचा अंश, मराठ्यांच्या राजाचा वंश तूं वाढवत्ये आहेस. तुझी अवस्था नाजुक आहे. अशा वेळीं इतका राग बरा नव्हे!" शांत स्वभावाच्या येसूबाईनें आपल्या जावेला समजावण्याचा प्रयत्न केला.

"बाई, तुम्हांला यापुढें ही तारू शांत दिसायचीच नाहीं. मी शांत होईन तेव्हांच, जेव्हां त्या दुष्टाला आणि त्याच्या सरदारांना इथून पळवून लावीन." ताराबाईनें आपल्या विधवा जावेसमोर प्रतिज्ञा केली. ज्या दुष्ट, धर्मवेडया, राज्यलोभी औरंगजेबानें तिच्या दिराला हालहाल करून ठार केलें; ज्या घातक्यानें महाराणी येसू-बाई आणि बाळराजे शिवाजी (शाहू) यांना जिवंत वा मेलेले पकडून आणण्यासाठीं झुल्फिकारखानाजवळ एक लाख सैन्य देऊन रायगडाला वेढा घातला, त्या औरंगजेबाबद्दल ताराबाईच्या मनांत भयंकर सूडाची आग पेटलेली होती. तडफदार, करारी, स्वाभि-मानी माणसाला आपल्या शत्रूबद्दल चीडच वाटणार, संतापच येणार. औरंगजेबाबद्दल ताराबाईची हीच भावना होती. औरंग-जेबावर त्याच्या दुष्ट कृत्यांबद्दल सूड उगविण्याचे विचार, आपल्या जावेचा मोठ्या कष्टानें निरोप घेतांना तिच्या मनांत येत होते. नव्हे, त्याहि अगोदर कितीतरी दिवसांपासून ते येत होते. शिवाजी महाराजांचा अकालीं मृत्यु घडला तेव्हां ताराबाईचें वय सारें सात

आठ वर्षांचें होतें. शिवाजी महाराजांची स्नुषा, राजारामाची पत्नी म्हणून तिनें भोसल्यांच्या घरांत प्रवेश केला होता. शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधानांपैकीं जे सेनापति हंबीरराव मोहिते त्यांची ताराबाई मुलगी. लहानपणापासूनच मोठी बाणेदार अणि तडफदार होती ताराबाई.

तिच्या या गुणवैशिष्ट्यांचें दर्शन घडण्याचा प्रसंग शिवाजी महाराजांना एकदां आला. रायगडाखालच्या शेतमळ्यांतून कोल्ह्यांचा आणि तरसांचा फार उपद्रव होऊं लागला आहे, अशी वातमी गडावर आली. तीं रानवट जनावरें गरीबगुरीब शेतकऱ्यांच्या कोंबड्या, मेंढरें, नुकतींच जन्मलेलीं वासरें पळवूं लागलीं. शेतांत शिरायचें; ज्वारीचीं ताटें, भाताचें पीक आडवें करायचें आणि शेतकऱ्यांच्या कोंबड्या, वासरें पळवायचीं हा त्या रानटी प्राण्यांचा नेहमींचा उद्योग होऊन बसला. मोहित्यांची कांहीं नातलग मंडळी गडाखालच्या शेतांतून रहात होती. लहानगी तारु एकदां अशाच एका दूरच्या आजीकडे गेली असतांना तिनें ऐकलें कीं लांडगे आणि तरस शेतांतून धुमाकूळ घालतात, आणि त्यांच्यापुढें कोणाचेंच कांहीं चालत नाहीं.

"आजी, हीं पुरुषमाणसें मारत कां नाहींत त्या प्राण्यांना?" तारूनें आपले डोळे विस्फारून विचारलें.

"अग वयाऽ लई वंगाळ जनावरें हायती तीं. वाप्यांना घावत न्हाईत तीं!" म्हाताऱ्या आजीबाईनीं आपला इरकली पदर सांवरीत तारूला सांगितलें.

"शिवाजी महाराजांच्या राज्यांतले गडी कोल्ह्याकुत्र्यांना भ्यायला लागले कीं काय?" असें म्हणत म्हणत तारूनें आपला पदर डोक्यावरून घट्ट ओढून घेतला आणि तो कमरेला खोचून ती

अनुक्रम ७६७९८ ... वि. बा.-बा. .....
क्रमांक ...३५६० ..... नोंद दि. ३।७।३।७९


लगबगीनें पायांतील वहाण कर कर वाजवीत निघाली. जातां जातां तिनें कोपऱ्यांतील भाला घेतला. म्हाताऱ्या आजीनें " तारू, ए पोरी! अग ऽ कुटं निघालीस ?" असें ओरडून विचारलें. पण तारूने



जाणूनबुजून तिकडे दुर्लक्ष केलें. आजीला तिच्या पायांतील जाड सांखळ्यांचा आणि कोऱ्या वहाणांचा आवाज ऐकूं आला. तारू एका शेतांत शिरली. तिच्या आवेशानें शेतांत काम करणारे पुरुष थक्क होऊन गेले. एवढीशी पोर भाला परजून शेतांत शिरलेली पाहून त्यांना क्षणभर स्वतःची लाज वाटली, ते तारूच्या जवळ जाऊन तिच्या हातांतून भाला घेऊं लागले. तशी तारू खेकसली, " नाहीं. मुळींच सोडणार नाहीं. ते तरस आणि कोल्हे कुठें आहेत दाखवा मला अगोदर."

"अग, आम्ही करूं बंदोबस्त त्यांचा !" एका जाणत्यानें उद्‌गार काढले.

" तुम्ही कसला बंदोबस्त करणार ? तुम्ही असे भाले सरसावून इथें उभे रहातां, तर कोल्ह्यातरसांची काय टाप होती

कोंबड्या अन् गुरें पळवायची ? मग गडावर कशाला बातम्या आल्या असत्या गांवच्या त्रासाच्या ?" त्या चिमुरडीच्या आवेशपूर्ण उद्गारांनीं शेतकरी अधिकच वरमले. "शिवाजी राजांचीं माणसें तुम्ही ! साधा कोल्हयाकुत्र्यांचा बंदोबस्त होईना तुमच्याच्यानें ?" असें आवेशपूर्ण उद्गार तिने काढले. आणि त्यानंतर त्या खेड्यांतले बाप्ये खरोखरच खडबडून जागे झाले. दुसऱ्याच दिवसापासून त्यांच्या हातांत गोफणीऐवजीं भाले दिसूं लागले. मग कोल्हयातरसांचा त्रास कमी व्हायला काय वेळ ?

तारू गडावर परतली, पण तिच्या चेतावणीनें गडाखालच्या गांवाचा तरसाकोल्हयांचा त्रास थांबला होता. लोकांनीं आळीपाळीनें शेतांत पहारा देऊन कोल्हयातरसांचा नायनाट करण्याचा सपाटा चालविला होता. ज्याच्या त्याच्या तोंडी तारूचें कौतुक होतें. हंबीरराव मोहित्यांच्या अंगावर मूठभर मांस चढलें लेकीचें तें कौतुक ऐकून. त्यांनीं शिवाजी राजांच्या कानावर ही हकीगत घालण्याचा मनसुबा रचला. पण हंबीररावांनीं सुरुवात करतांच राजे हंसले आणि त्यांनीं हंबीररावांना म्हटलें,

"सेनापति, फार बाणेदार लेक दिसते तुमची. तिच्या नुसत्या शब्दांनीं एवढी जादू केली ! आम्ही तिला खास बक्षिसी देणार आहोंत." क्षणभर थांबून ते संथपणें म्हणाले. "आमच्या घरांत सून म्हणून आणणार आहोंत आम्ही तारूला. चालेल ?"

"चालेल ? महाराज हें काय विचारणें ? यापरता दुसरा आनंद नाहीं." हंबीरराव लगबगीनें उठले आणि त्यांनीं आपल्या थोर व्याहयांना आलिंगन दिलें.

रायगडावरच ताराबाई आणि राजारामांचें लग्न लागलें. संभाजीराजे व येसूबाई यांना आपल्या घरांत आलेली नवी नवरी

पाहून फार आनंद झाला. हळदीच्या वस्त्रांत लपलेल्या ताराने उंबरठ्यावरचें माप ओलांडलें आणि सासरच्या सगळ्यांचीं हृदयें जिंकून घेतलीं. आपल्या दोन्ही सुना देखण्या, स्वाभिमानी, नि शूर निघाल्या म्हणून महाराज फार आनंदांत होते. पण तो आनंद अनुभवायला महाराज पुढें फार दिवस जगले नाहींत. त्यांच्या अकालीं मृत्यूनें मराठी राज्यावरील ध्वजस्तंभच उखडला गेला. संभाजी राजे झाले आणि त्यांच्या राज्यकारभारानें सारी मराठेशाही खिळखिळी करून टाकली. संभाजी राजांनीं विश्वासू सच्चा लोकांचा वध केला आणि उभ्या मराठेशाहीच्या काळजाचें पाणी पाणी झालें. ते स्वतः व्यसनाधीन झाले आणि त्याचाच फायदा घेऊन दुष्ट औरंगजेबानें त्यांना पकडलें. पकडलें एवढेंच नव्हे तर त्यांचे हालहाल करून त्यांना ठार मारलें. त्यांचा वध करून तिकडे पातशहा खदखदां हंसूं लागला. इकडे दुर्दैवी महाराणी येसूबाई आणि तिच्यासह सारी मराठेशाही अश्रुसिंचन करूं लागली. रडली नाहीं एकच स्त्री ! त्या स्त्रीच्या हृदयांत, डोक्यांत, डोळ्यांत आग पेटली. तिनें त्याच क्षणीं बादशहाचा सूड उगवायची प्रतिज्ञा केली.

तो स्त्री होती मानी ताराबाई. येसूबाईने आपल्या जावेचें सांत्वन केलें त्यावेळीं तिच्या डोळ्यांची कडसुद्धां ओली झाली नाहीं. औरंगजेबाचें नांव उच्चारलें जातांच तिनें संतापानें आपला ओठ चावला इतकेंच.

" बाईऽ, त्या दुष्टाचें नांव घेऊन नुसते अश्रु ढाळून कांहीं उपयोग नाहीं. त्यासाठीं रक्तच सांडायला हवें. मराठी राज्याच्या राजाची, प्रत्यक्ष थोरल्या महाराजांच्या मुलाची, त्यानें कपटानें हत्या केली. त्याला वाटलें असेल मराठ्यांचें राज्य आटोपलें. पण त्याला हें माहीत नाहीं, कीं मराठ्यांची जिद्द अजून शिल्लक आहे.

संभाजी राजांचे भाऊ-भावजय अजून जिवंत आहेत. भोंसल्यांच्या सेनापतींची मुलगी सूडानें पेटून उठलेली आहे!"

"तारू, तुझ्या या शब्दांनीं या दुर्दशेंतहि मला धीर येईल. तूं बोलशील तसें नक्कीच करशील खात्री आहे मला." महाराणी येसूबाईला अंधारांत कुठेंतरी ज्योत दिसल्याचा भास झाला. आपलें दुःख गिळून तिनें राजारामाच्या सल्ल्यानें आपल्या बाळराजाला अभिषेक करायचें ठरविलें. आणि अचानक किल्लेदारानें बातमी आणली, "झुल्फिकारखान मोठी फौज घेऊन चालून येत आहे. महाराणी, बाळराजे आणि राजाराम महाराज यांना पकडण्याचा विडा उचलला आहे त्यानें!"

येसूबाई याहि वार्तेनें डगमगली नाहीं. तिनें, मनाशीं निश्चय केला. तिला राजारामाबद्दल विलक्षण विश्वास होता. तो जर झुल्फिकारखानाच्या वेढ्यांतून निसटला तर आपली सोडवणूक करूं शकेल, मराठी दौलत जिवंत राखील असें तिला ठामपणें वाटलें. म्हणून तिनें निवडक लोकांसह राजारामाला रायगड सोडायला भाग पाडलें.

गडाला खानाचा वेढा पडला. ताराबाईयेसूबाईच्या-सल्ल्यानें किल्लेदार गड लढविण्याची पराकाष्ठा करीत होता. आणि तशांतच येसूबाईला कळून आलें कीं, तारू आतां माता होणार! 'समजा, उद्यां गड पडला तर गर्भवती तारूची काय स्थिति होईल, तिचे किती हाल होतील!' या विचारानें महाराणी येसूबाई बेचैन झाली. कांहीं करून तारूला गडाबाहेर सुरक्षित स्थळीं पोहोंचती करायचा तिनें बेत आंखला आणि ताराबाईची इच्छा नसतांनाहि तिला विशाळगडावर जाऊन रहाण्याची आज्ञा तिनें केली. येसूबाईचा निरोप घेतेवेळीं ताराबाईनें परत एकदां आपल्या प्रतिज्ञेचा उच्चार केला आणि जड पावलांनीं, जड अंतःकरणानें ती गडाबाहेर पडली.

विशाळगडावर एकाकीपणें हिंडत असलेल्या ताराला भावी मातृत्वाच्या सुखापेक्षां औरंगजेबाचा सूड घेण्याची ओढ अधिक लागली होती. आपल्या भावी अपत्याचें इवलेंसें मुख नजरेसमोर येण्यापेक्षां आपल्या विधवा जावेचें– महाराणी येसूबाईचें म्लान मुखकमलच तिच्या नजरेसमोर येत होतें. नकळत तिच्या मुठी वळत होत्या. डोळे विस्फारले जात होते. शरीरांत, मनांत डोक्यांत एकाच विचाराचें तांडवनृत्य चालू होतें–'सूड ! क्रूरकर्मा औरंगजेबाचा सूड ! मराठी राज्यावर गिधाडासारखी झडप घालायला टपलेल्या दिल्लीश्वराचा सूड !' विचार करतां करतां तिला थोरल्या महाराजांची धीरगंभीर तेजस्वी मुद्रा आठवे. त्यांनीं स्वराज्याच्या स्थापनेसाठीं किती कष्ट घेतले तें आठवे. त्यांनीं एकेक करून किती गुणी माणसें जोडलीं तें आठवे. त्यांनीं मोंगलांच्या जबड्यांत अडकलेला स्वराज्यांतील एकेक किल्ला कसा सोडविला तें आठवे. आणि तिच्या तोंडून अभावितपणें उद्‌गार बाहेर पडत, " शिव ! शिव ! महाराज केवढा आपला पराक्रम, केवढा आपला आटापिटा, केवढा आपला पसारा ! आपल्याला जमलें सारें तें ! खरोखरी आपण परमेश्वराचे अवतार होतां ! पण आम्हीं कसें करावें ? आपण गेलांत आणि पातशहानें डाव साधला. भोंसल्यांच्या कुळाची आणि त्याचबरोबर साऱ्या मराठी राज्याची धुळधाण उडवायचा विडा उचलला आहे त्यानें ! महाराज, आमच्या पाठीशीं उभे रहा; आपल्या आशीर्वादावरच आम्ही स्वराज्याचा हा संसार, हा सारा पसारा सांभाळणार."

खिन्न होऊन ताराबाई बसल्या ठिकाणाहून उठे. आपल्यासाठीं खास राखून ठेवलेल्या दालनांत जाई. येसूबाईसाहेबांच्या सांगण्यावरून गडकरी व रामचंद्र अमात्य यांनीं तिला कशांत म्हणून

कमी केलें नव्हतें. तिच्यासाठीं जेवायला खायला वेगवेगळे पदार्थ तयार होत होते. दासी-कुळंबिणी तिच्या सेवेसाठीं अहोरात्र तत्पर होत्या. तिला सुख लागावें म्हणून सारे झटत होते. पण ताराबाईला तें सुखच असह्य झालें होतें. कधीं एकदां आपली सुटका होते आणि कधीं आपण आपल्या श्रेष्ठ पतीच्या मदतीनें झुल्फिकारखानाच्या वेढ्यांत अडकलेल्या जावेची आणि बाळराजे शाहू महाराजांची सुटका करतों असें तिला झालें होतें. या विचारांनीं अस्वस्थ झालेली ताराबाई आपल्या महालांत एके दिवशीं बसलेली असतां॰ नाच रामचंद्रपंत अमात्य खालीं मान घालून पुढें आले आणि त्यांनीं तिला क्षीण आवाजांत बातमी दिली,

"महाराणी येसूबाईसाहेब आणि बाळराजे पातशहाचे कैदी झाले."

"झूट! अशक्य! खोटें!" ताराबाई अमात्यांचे शब्द ऐकून आपल्या जागेवरून ताडकन् उठून म्हणाली.

"होय बाईसाहेब, आपल्याला सांगितलेली कुवार्ता अगदीं खरी आहे. मराठेशाहीच्या दुर्दैवानें खरी आहे." रामचंद्रपंत अमात्यांना जणूं स्वतःच घोर अपराध केल्यासारखें वाटत होतें.

"कां? सूर्याजीपंत पिसाळासारखा भारी किल्लेदार तिथें असतांना ही गोष्ट घडली? त्याची स्वामिनिष्ठा, त्याचें शौर्य कुठें कमी तर नाहीं पडलें? मी किल्ल्यावर असतांना त्याला लावायला सांगितलेले मोर्चे आणि गड लढविण्याची नवी हिकमत तो इतक्यांत विसरला?" ताराबाईच्या नेत्रांतून जणूं अंगार बाहेर पडत होता.

"बाईसाहेब, त्याची स्वामिनिष्ठा, त्याचें शौर्य यावर एका फार मोठ्या राक्षसानें मात केली. झुल्फिकारखानानें दाखविलेल्या लालुचीला सूर्याजी पिसाळ बळी पडला. गडापेक्षांहि कणखर

असलेल्या त्याच्या मनांतून त्या लालुचीनें स्वामिनिष्ठेला हांकलून दिलें. बाईसाहेब, पिसाळ खानाला फितूर झाला ! ...लाख मोलाचा रायगड आणि त्यापेक्षांहि कोटिकोटि मोलाची आपली महाराणी आणि बाळराजे त्यानें आपल्या हातानें खानाच्या स्वाधीन केले ! बाईसाहेब, त्या बाबतींत आतां सारें संपलें आहे." रामचंद्रपंत अमात्य मोठ्या उद्वेगानें उद्गारले.

"अमात्य, काय बोलतां तुम्ही हें ? सारें संपलें म्हणतां ? मराठ्यांची महाराणी कैद करून पातशहानें आमच्यावर कडी केली खरी ! पण आतां फारच थोडा वेळ त्याची मिजास चालणार आहे. ह्या ताराबाईच्या मनगटांतील जोराला, डोक्यांतील विचारांना पातशहानें जणुं आव्हान दिलें आहे. आतां माझ्या तोंडांतून माझ्या बाळराजासाठीं पाळणें आणि अंगाईगीतें बाहेर पडणार नाहींत. ह्या मुखांतून आतां एकच गर्जना बाहेर पडेल–'हर हर महादेव !' माझ्या बाळराजाचीं बाळलेणीं हातीं घेऊन मी कधींच त्याचें कौतुक करीत या महालांत स्वस्थ बसणार नाहीं. ही थोरल्या महाराजांची स्नुषा हातीं तलवार घेऊन गांवोगांव हिंडेल. किल्ल्याकिल्ल्यांतून फिरत राहील. सार्‍यांना सांगेल–हें राज्य आपलें आहे, मराठ्यांचें आहे. पातशहानें तें गिळण्यासाठीं डाव टाकला आहे. उठा, सज्ज व्हा, पातशहाला आपल्या मुलुखांतून हाकलून लावण्यासाठीं आपले भालेबरच्या सिद्ध करा."

ताराबाईच्या आवेशपूर्ण उद्गारांनीं रामचंद्रपंत अमात्यांना नकळत अवसान चढलें. त्या क्षणापर्यंत, आतां आपल्याला कोणी त्राता नाहीं, आपला कोणी नेता नाहीं अशी त्यांची भावना झाली होती. पण ताराबाईच्या मानी मुखांतून स्फूर्तीचे गंगौघ बाहेर पडले आणि त्यांनीं अमात्यांच्या मनांतील सारी भीति नाहींशी केली.

त्यांनीं मोठ्या हिकमतीनें ताराबाई आणि राजाराम महाराजांची भेट घडवून दिली. पति-पत्नी एकमेकांना फार दिवसांनीं भेटल्यानंतरहि त्यांच्यांत ज्या गोष्टी झाल्या त्या मराठी राज्य वांचविण्याच्या ! पातशहाच्या दुष्ट डावांतून थोरल्या महाराजांनीं स्थापिलेलें स्वराज्य सुखरूप बाहेर काढण्याच्या ! त्यांचे बाळराजे 'शिवाजी' मोठे होत होते. पण त्यांना वाढविण्या-जपण्यापेक्षां राजाराम-ताराबाई एकदिलानें व एकविचारानें मराठ्यांचें राज्य वांचविण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होतीं. समोर ठाकलेल्या प्रत्येक दुर्दैवाशीं सामना देत होतीं. आणि तुफानांत सांपडलेली आपली राज्यनौका कशीबशी पैलतीराकडे वल्हविण्याचा प्रयत्न करीत होतीं. आणि तशांतच एका कुक्षणीं त्या नौकेचा एक नावाडी काळाच्या उदरांत गडप झाला. इ. स. १७०० सालीं मराठी राज्य वांचविण्याच्या कष्टांमुळें राजाराम महाराज मृत्युमुखीं पडले.

ताराबाईवर आभाळच कोंसळलें. पण त्याहि प्रसंगावर ताराबाईच्या स्वभावानें मात केली. वैधव्याचें अपार दु:ख बाजूला सारून ती औरंगजेबाशीं सामना द्यायला पुढें सरसावली. राजाराम महाराजांच्या मृत्यूमुळें मराठे सरदार पुरतेच हवालदील झाले. त्यांच्या समशेरी गळून पडल्या. घोडीं पागेमध्येंच बांधून पडलेलीं राहूं लागलीं. आपल्या भरदार, कल्लेदार मिशांना पीळ देत हिंडणारी धनाजी जाधव, रामचंद्रपंत अमात्य, परशुराम त्र्यंबक, संक्राजी नारायण ही मंडळी मुकाटपणें हिंडूं लागली. आणि स्वराज्याच्या किल्ल्याकिल्ल्यावरचें भगवें निशाण जाऊन तेथें मोंगलांचें हिरवे चांद फडकूं लागले. ताराबाईनें सारी परिस्थिति ओळखली. मराठ्यांच्या शूर सरदारांची नेत्याअभावीं चाललेली परवड तिनें ओळखली आणि तिनें त्या साऱ्यांना एकत्र बोलाविलें.

ताराबाई त्यांच्या दृष्टीनें वयानें कितीतरी लहान! तरीपण तिनें राज्यावरील अधिकारी या नात्यानें त्यांना धीर दिला. अवसान खचूं न देण्याबद्दल इशारा दिला. आणि स्वतःच त्या रणकंदनांत शिरण्याची तयारी तिनें दर्शविली. मरगळलेलीं मराठी मनें नव्या उत्साहानें ताराबाईनें सांगितलेल्या कामगिरीवर निघालीं. मर्द मराठे सरदार आपापल्या फौजांनिशीं औरंगजेबाच्या तळावर धाड घालूं लागले. थोरल्या महाराजांच्या धाकट्या सुनेनें नुसत्या शब्दांनिशी साऱ्यांच्या मनांत, हालचालींत चैतन्य निर्माण केलें. तिनें दऱ्याखोऱ्यांतून हिंडण्याचा, मराठ्यांना एकसंध करण्याचा सपाटा



चालविला. पूर्वीं कधीं नव्हते इतके सारे मराठे शत्रूविरुद्ध एक झाले. ताराबाईचा शब्द प्रमाण मानूं लागले. आणि पातशहानें धाडलेल्या अवाढव्य फौजेशीं सामना देऊं लागले. जोंवर मराठे जागरुक नव्हते तोंपर्यंत औरंगजेब एकापाठोपाठ एक किल्ले घेऊं शकला. आज काय सिंहगड घेतला. उद्यां काय रायगड पाडाव केला. परवां पन्हाळा, तेरवां पुरंदर; आणखी दोन दिवसांनीं परळी!

पातशहाला आनंदानें वेड लागायची पाळी आली. मराठ्यांचें राज्य धुळीला मिळविण्यांत आपण यशस्वी झालों अशाभ्रमांत त्यानें मराठ्यांचे गडकोट जिंकणाऱ्या खानांना पदव्या देण्याचा सपाटा चालविला. पण त्याला कुठें कल्पना होती कीं एका स्फूर्तिदेवतेच्या शब्दांनीं मराठ्यांच्या मनांत पुन्हां चैतन्य आणि मनगटांत विलक्षण जोर चढला आहे ? सिंहगड जिंकला या आनंदांत पातशहा आहे तोंच त्याच्या कानीं बातम्या येऊं लागल्या, " पुरंदर पुन्हां मराठ्यांनीं घेतला ! " पुढचा एक गड घ्यावा तों मागचा एखादा गड त्याच्या हातून जाऊं लागला. एवढ्यावरच पातशहाचे कान किटायचे थांबणार नव्हते. लवकरच मराठ्यांची नजर त्याच्या मुलुखाकडेहि वळली. खंडेराव दाभाड्यांनीं सुरत-भडोचवरून गुजरातवर छापा घातला. नेमाजी शिंदे भिमथडी तट्टांना घेऊन भोपाळपलीकडे सिरंजपर्यंतचा मुलूख उद्ध्वस्त करून आले. एवढेंच नव्हे तर त्यांच्या फौजेनें ओरिसापर्यंत पातशहाच्या मुलुखांत थैमान घातलें. अखेर शेवटीं पातशहा औरंगजेब अगदीं त्रासून गेला. कुठून या मराठ्यांना जिंकायला आलों असें त्याला होऊन गेलें. औरंगाबादजवळच्या आपल्या छावणींत स्वस्थ बसण्याखेरीज त्याला गत्यंतर उरलें नाहीं. हात चोळीत मराठ्यांना शिव्याशाप देत तो जराजर्जर दिल्लीश्वर आपले अखेरचे दिवस मोजीत होता आणि म्हणत होता, " मराठ्यांची औलाद बाकी औरच ! राजा मेला... राजाच्या मुलाला मी ठार केलें. राजाची सून नि नातू यांना पकडून नेलें. तरी दख्खनचे हे चुव्वे शरण आले नाहींत मला ! "

पातशहाला काय माहीत मराठ्यांच्या बाजूनें मानी, शूर आणि त्याहिपेक्षां सदैव स्फूर्ति देणारी एक देवता ताराबाईच्या रूपानें उभी ठाकली आहे म्हणून ?

* * *

# ३५ आईचें अंतःकरण

बालमैत्रिणींनो,

प्रसंग असा आहे-सुट्टीचा दिवस आहे. दुपारची वेळ आहे. तुमचीं जेवणें नुकतींच आटोपलेलीं आहेत. भरल्या पोटीं ढेकर देत तुम्ही अंगणांत किंवा मुख्य दरवाजापुढें खेळत आहांत. कोणी एकादा भिक्षेकरी कांहीं भिक्षा मिळेल या आशेनें तुमच्या दाराशीं आला आहे. तुम्ही लगेच त्यांच्या अंगावर वस्सदिशीं ओरडतां आहांत-"ए, इथें कांहीं मिळणार नाहीं. चल जा, चालता हो पुढें."

पण तो मात्र तुमच्या निष्ठुरपणाला दाद न देतां, तस्सा उभा आहे. कारण त्याला खात्री आहे कीं,' या घरच्या बाईला आपली दया येणार.' आणि घडतें आहे तसेंच! भिक्षेकऱ्याच्या आरोळी-सरशी तुमची आई आपल्या हातांतील काम टाकून आली आहे. येतांना तिनें मूठभर तांदूळ नाहींतर चारदोन सुटे पैसे आणले आहेत. आणि तिनें ती भिक्षा त्या भिक्षेकऱ्याच्या झोळींत टाकली आहे. आईच्या या कृतीवर नाराज होऊन तुम्ही म्हणत आहांत-"आई, उगीचच घातलींस त्याला भिक्षा. आतां रोज येईल तो."

"येऊं दे रे. एवढेंसें देण्यानें आपल्याला काय कमी पडणार आहे? घरीं त्याचीं पोरेंबाळें असतील म्हणून मागत असेल हा भीक! उगीच का कोणी भीक मागतें?"

बालमैत्रिणींनो, तुमच्या आईची ही उक्ति दयेनें ओतप्रोत भरलेली ! तुमच्या आईला त्या भिक्षेकऱ्याचीं पोरेंबाळें आठवतात. तिला वाटतें–'आपलीं मुलें भरल्यापोटीं हिंडताहेत, ह्या भिक्षेकऱ्याचींहि तशींच हिंडोत.'

स्वत:च्या भूमिकेंतून दुसऱ्याकडे बघण्याची ही जी दृष्टि तिचें नांव दया. आम्ही लहानपणीं एकदां आमच्या काकांकडे दिल्लीला गेलों होतों. काकांच्या बिऱ्हाडाशेजारीं एका पंजाबी कुटुंबाचें बिऱ्हाड होतें. त्यांच्या कुटुंबप्रमुखास आम्ही 'लालाजी' म्हणत असूं. दिल्लीला उन्हाळा जसा कडक तशी थंडीहि कडाक्याची. एक दोन गरम कपडे घातल्याशिवाय ती थंडी सोसवायचीच नाहीं. लालाजींना कपड्यांचा विलक्षण शोक. थंडीसाठीं त्यांनीं खास नवनवे कपडे शिवून घेतलेले ! आम्हांला सर्वांना त्यांचा एक पांढऱ्या लोकरीचा कोट फार आवडायचा. लालाजी रोज तो कोट संध्याकाळीं अंगांत चढवायचे. एक दिवस त्यांच्या हाताखालचा एक कामगार त्यांच्याकडे आला होता. बिचाऱ्याच्या अंगावर बेताचेच कपडे होते. कुडकुडत तो अदबीनें दरवाजाबाहेर उभा होता. लालाजींनीं आंत बोलावून त्याला गरम गरम मसाल्याचें दूध पाजलें आणि तो नको नको म्हणत असतांना त्याच्या अंगावर आपला कोट घातला. आम्ही त्यांच्या या कृतीकडे बघतच राहिलों. तेव्हां ते म्हणाले, " बच्चों, वह भी हमारे तरह एक इन्सान हैं ! उसे भी धूप-छाँव लगती है। हममें और उसमें सिर्फ इतनाही फर्क है कि, हम जो चाहते हैं खरीद सकते हैं वह, नहीं ! "

किती थोर अंत:करणाचे होते लालाजी ! हाताखालच्या कामगाराला त्यांनीं स्वत:च्या अंगांतील कोट काढून दिला. ह्याला म्हणतात दया.

महाभारताची नायिका द्रौपदी हिच्या थोर व्यक्तित्वाची साक्ष अशाच एका कृतींत पहायला सांपडते. द्रौपदी यज्ञवेदींतून निर्माण झालेली. तेजाची जणुं पुतळी. अर्जुनानें पण जिंकून तिला मिळविली आणि ती पांडवपत्नी झाली. दुर्योधन, कर्ण इत्यादि कौरवांच्या बाजूच्या श्रेष्ठांना पहिल्यापासून पांडवांचा राग. त्यांत त्यांना हवी असलेली द्रौपदी पांडवांनीं मिळविली. झालें! जशी ती पांडवपत्नी झाली तशी दुर्योधन, दुःशासन, कर्ण, शकुनी यांनीं पांडवांना छळायला सुरुवात केली. त्यांनीं पहिल्यांदा त्यांना द्यूतांत हरविलें आणि आपले दास बनविलें. द्रौपदीची विटंबना केली. दुसऱ्या खेपेला त्यांना बारा वर्षें वनवास आणि एक वर्ष अज्ञात-वास भोगायला लावला. मानी द्रौपदीला हा अपमान सहन झाला नाहीं, तिनें पांडवांना कौरवांशीं महायुद्ध करण्यास भाग पाडलें. तिला तिचा झालेला अपमान धुऊन काढायचा होता. आणि तिच्या इच्छेप्रमाणें सर्व गोष्टी घडून येणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं. कौरवांकडील एकेक अतिरथी महारथी कुरुक्षेत्रावरील रणांगणावर पडूं लागले. पितामह भीष्मांचा वध शिखंडीनें केला आणि कौरव-सैन्यांत हाहाकार माजला. कौरवांच्या बाजूला होते कौरवपांडवांचे गुरु द्रोणाचार्य. मग त्यांच्याकडे दुर्योधनानें सेनापतिपदाची जबाबदारी दिली.

द्रोणाचार्यांनीं आपल्या अजोड पराक्रमानें पांडवसेनेची दाणादाण उडवून दिली. त्यांच्या अस्त्रबलापुढें आणि सैन्यरचने-पुढें भीमार्जुनांचें कांहीं चालेना. तेव्हां द्रोणाचार्यांना मारण्यासाठीं शक्तीपेक्षां युक्तीचाच वापर अधिक करा असा सल्ला भगवान् श्रीकृष्णांनीं पांडवांना दिला. एके समयीं सर्वत्र हूल उठली, "अश्व-त्थामा मेला," "अश्वत्थामा मेला." अश्वत्थामा हा द्रोणाचार्यांचा

मुलगा आपल्या पुत्राच्या निधनाची बातमी खरी आहे कीं नाहीं हें द्रोणांना कळेना. त्यांचें मन युद्धांत एकाग्र होईना. त्यांनीं धनुष्य-बाण खालीं ठेवला आणि धर्मराजाला विचारलें, "हे सत्यप्रिया, अश्वत्थामा ठार झाला का?" "होय," असें मोठ्यानें उत्तर देऊन, धर्मराज हळूच पुटपुटला, "नरो वा कुंजरो वा!" खरें म्हणजे दुर्योधनाच्या हत्तीदलांत अश्वत्थामा नांवाचा एक हत्ती होता तो ठार झाला होता. त्यामुळें धर्मराजानें संदिग्धपणा स्वीकारला.

द्रोणाचार्य दुःखावेगानें शस्त्रसंन्यास करून रथावर स्वस्थ बसले. आणि ही संधि साधून पांडवांच्या दिशेनें एक बाण सूं सूं करीत आला आणि त्यानें आपलें काम बजावलें. द्रोणाचार्य धाड-कन् रथांत कोसळले. द्रौपदीचा बंधु धृष्टद्युम्न यानें द्रोणांचा वध केला. कौरवांचा सेनानी पांडवांनीं मारला. अश्वत्थामा म्हणजे द्रोणाचार्यांचा पुत्र त्या वेळीं दुसरीकडे युद्ध करण्यांत गुंतला होता. त्याला पित्याच्या निधनाची वार्ता समजली आणि त्यामागील कपट-नीतीहि! तत्क्षणीं त्यानें धृष्टद्युम्नाचा वध करण्याची प्रतिज्ञा केली. अश्वत्थामा अतिशय शूर आणि शस्त्रकलानिपुण. द्रोणाचार्यांनीं अर्जुनाप्रमाणेंच त्यालाहि शस्त्रास्त्रविद्येचें शिक्षण दिलेलें. अर्जुन द्रोणांचा शिष्य तर अश्वत्थामा पुत्र; दोघांनाहि सारखीच विद्या द्रोणांनीं शिकविलेली. पण भारतीय युद्धांत ते एकमेकांचे शत्रु बनले!

अश्वत्थामा कितीहि शूर असला तरी भडक डोक्याचा होता. एकदां एकादी गोष्ट मनांत आणली कीं, ती योग्य आहे का अयोग्य याचा विचार तो करीत नसे. अर्जुनाशीं वैर धरण्याचें त्याला प्रत्यक्ष असें कांहींच कारण नव्हतें. पण केवळ तो आपल्याला तुल्य-बळ आहे तेव्हां त्याच्याशीं वैर धरायचें एवढेंच तो जाणत होता. त्यानें दुर्योधनाचा पक्ष उचलून धरला होता. दुर्योधनाला विजय

मिळावा अशी इतर कांहीं वीरांप्रमाणें त्यालाहि इच्छा होती. पण इतके दिवस अन्यायानें वागलेल्या दुष्ट क्रूर कौरवांना भीष्म, द्रोण, कर्ण, शाल्व, जयद्रथ, अश्वत्थामा, दुःशासन इत्यादि अतिरथी-महारथींच्या जोरावरहि युद्ध जिकतां येणें अशक्य होतें. युद्धाच्या सुरुवातीला नऊ दिवसपर्यंत कौरवांचें पारडें जड होतें. पण भीष्माचार्यांचा अंत झाला आणि त्यांच्या मागोमाग एकेक खंदे वीर धुळींत लोळण घेऊं लागले. द्रोण गेले. जयद्रथ ठार झाला. कर्ण संपला. दुःशासनाचा क्रूरपणें निकाल लागला. शेवटच्या दोन दिवसांत कौरवांच्या बाजूनें फक्त दुर्योधन आणि अश्वत्थामा एवढेच नांव घेण्यासारखे वीर शिल्लक राहिले.

दुर्योधनाला भीमानें गदायुद्धाचें आव्हान दिलें. आणि ते दोघे वीर एकमेकांवर वार करून विजयश्री आपल्याकडे खेंचण्याची पराकाष्ठा करूं लागले. भीमाच्या डोळ्यांत दुर्योधनाची मांडी सलत होती. त्याच मांडीवर हात ठेवून भरसभेंत दुर्योधनानें द्रौपदीची निर्लज्ज चेष्टा केली होती. तेव्हांपासून भीमाच्या मनांत द्रौपदीच्या अपमानाचा सूड घेण्याचे विचार पक्के झालेले होते. द्रौपदीला फराफरा ओढीत आणणाऱ्या दुःशासनाचें रक्त तर तो प्रतिज्ञेप्रमाणें प्यायला होता आणि त्याच्या रक्तानें माखलेल्या हातानें त्यानें द्रौपदीची वेणी घातली होती. आतां आपल्या प्रतिज्ञेचा उरलेला भाग पूर्ण करण्याच्या ईर्षेनें तो दुर्योधनाशीं लढत होता. आणि तो पहा त्यानें एक प्रहार केला. दुर्योधनाच्या कमरेखालीं त्यानें डाव्या मांडीवर प्रहार केला आणि दुर्योधन, कौरवांचा सेनानी, गांधारी-धृतराष्ट्राचा तो कुपुत्र मातींत लोळण घेऊं लागला. भीमाची गदा त्याला जिव्हारीं लागली होती. तो धुळींत पडला आणि भारतीय युद्धाचा शेवट झाला. पांडव विजयी झाले.

पांडवांच्यां शिबिरांत आनंदोत्सव चालू झाला. नगारे, सनया, चौघडे यांचा मंगल गजर झाला. द्रौपदीला परमानंद झाला. ती तृप्त झाली. तिच्या अपमानाचा सूड पांडवांनीं भयानक संहार करून घेतला होता. तिची विटंबना करणारा दु:शासन रणांगणांत ठार झाला होता. तिची हेटाळणी करणारा दुर्योधन धुळीमधें अखेरच्या घटका मोजीत होता. कौरवकुलाचा संपूर्ण संहार झाला होता. याहून तिला आणखी काय हवें होतें? देवांनाहि पराक्रमांत लाजवितील असे पति, त्यांच्याच तोडीचे पांच पुत्र, धृष्टद्युम्नासारखा पराक्रमी भाऊ, भगवान् श्रीकृष्णासारखा सखा आणि वर नुकताच मिळालेला विजय! तेरा वर्षांनंतर प्रथमच तिनें आपला विपुल केशसंभार कुशलतेनें वर बांधला. त्यावर तिनें सुवर्णालंकार चढविले आणि भरजरी वस्त्रें नेसून ती आपल्या पति-पुत्रांसमवेत नर्मविनोद करीत शिबिरांत बसून राहिली.

इतक्यांत बाहेर रथ खडखडला. आणि सेवकानें त्वरेनें येऊन वार्ता दिली, " भगवान् आले आहेत !" ती वार्ता ऐकतांच द्रौपदीची कोण धांदल उडाली ! आपल्या दारीं आलेल्या त्या ज्येष्ठ पाहुण्याचें स्वागत कसें करावें याचा क्षणभर तिला संभ्रम पडला. ती गोंधळली. तेवढ्यांत भगवान् श्रीकृष्णांनीं आंत प्रवेशहि केला. साऱ्यांनीं उठून श्रीकृष्णांना नम्र अभिवादन केलें. श्रीकृष्णांनीं सर्वांचें कुशल विचारलें. पण त्यांचें सारें लक्ष होतें द्रौपदीवर. कितीतरी वर्षांनीं द्रौपदीच्या चेहऱ्यावर त्यांना समाधानाचे, तृप्ततेचे भाव पहायला सांपडले होते. वनवासांत जेव्हां जेव्हां ते तिला भेटायला गेले तेव्हां तेव्हां चिडलेली, संतापलेली, सूडभावनेनें पेटलेली द्रौपदीच त्यांनीं पाहिली होती. पांडवांचा अज्ञातवास संपून जेव्हां ते प्रकट झाले आणि कौरवांशीं तडजोडीचीं बोलणीं

करूं लागले तेव्हांचा द्रौपदीचा 'अवतार' त्यांना अजून स्मरत होता. आपल्या पतींची नेभळट विचारसरणी पाहून ती क्रोधानें इतकी संतप्त झाली होती कीं, तिच्या त्या रुद्रावतारांत त्रिभुवनें जळून भस्म होतात कीं काय असा भास भगवंतांना झाला. तिच्यासाठीं त्यांनीं महायुद्धाची तयारी केली. तिला कौरवांनीं ज्या हीनतेनें लेखलें त्याची भरपाई व्हावी म्हणून श्रीकृष्णांनीं पांडवांच्या वतीनें कौरवसभेंत सांगितलें, "आतां युद्ध अटळ आहे!"

कुरुक्षेत्रावर महाभारत घडलें आणि संपलेंहि. द्रौपदीचा पाणउतारा करणारे कुत्र्याच्या मोतीनें मेले होते. आणि द्रौपदीला त्याचाच आनंद सर्वांत अधिक झाला होता. तिच्या सतेज श्यामल मुखावर विजयश्रीचा विलास स्पष्ट दिसत होता. भगवन्तांनीं तिला विचारलें, "कृष्णे, आतां तरी तुझा राग शमला ना? आतां तरी तुझी खात्री पटली ना कीं, आपले पति आपल्या अपमानाचा सूड घेऊं शकतात!"

"होय, मधुसूदना, आज या पृथ्वीतलावर माझ्यासारखी सुखी आणि आनंदी स्त्री दुसरी कोणी नसेल." द्रौपदीचे डोळे आनंदातिशयानें भरून आले. तेव्हां भगवान् श्रीकृष्ण तिला म्हणाले, "सुभगे, आनंदानें म्हणून सुद्धां तूं अश्रुपात करूं नकोस. चल, ऊठ; आपल्याला देवदर्शनाला जायचें आहे. या महाभयंकर युद्धाला जेव्हां सुरुवात झाली तेव्हांच मी उपप्लव्य नगरीच्या देवीला नवस केला होता कीं, जर पांडव विजयी झाले तर त्यांना द्रौपदी-सह तुझ्या दर्शनाला आणीन."

"भगवन्ता, तूं आमचा सखा असल्यावर विजय केव्हांहि आम्हांलाच मिळणार, याबद्दल आमची खात्री होती. या आनंदाच्या क्षणीं तुझ्यासह देवदर्शनाचा योग येतो आहे ही केवढी भाग्याची

घटना आहे.'' सारे पांडव म्हणाले. आणि लवकरच ते श्रीकृष्णासह उपप्लव्य नगराच्या दिशेनें निघून गेले.

पांडवांच्या गमनाची वार्ता अजूनहि धुळींत लोळत पडलेल्या दुर्योधनाला नव्हती. विकलांग झालेला आणि अखेरच्या घटका मोजीत असलेला दुर्योधन अजूनहि पांडवांचा सूड कसा घेतां येईल याचाच विचार करीत होता. अश्वत्थामा अजूनहि त्याच्याशीं एकनिष्ठ होता. त्याच्या देहाला होणाऱ्या यातना कमी कशा होतील याचा विचार करीत तो उभा होता. मधेंच दुर्योधन ओरडला, "अश्वत्थाम्या, इथें काय थांबलास? तुझा शत्रु धृष्टद्युम्न आणि माझे शत्रु पांडव अजून जिवंत आहेत. मला इथें धुळींत लोळत टाकून ते विलासोपभोगांत दंग असतील. विजयोन्मादांत नाचत असतील. पण त्यांना म्हणावें, दुर्योधन अजून मेला नाहीं. तो जिवंत आहे आणि तो तुमचा सूड घेण्याच्या तयारींत आहे."

"दुर्योधना, सांग या क्षणीं मी तुझें काय प्रिय करूं? तुझ्या चित्ताला शांति वाटेल अशी कोणती कृति करूं?"

"अश्वत्थाम्या, आज रात्रीं पांडवांच्या शिबिरावर हल्ला कर. सारें शिबिर पेटवून दे. जाळपोळ–नासधूस कर. बेसावध, झोंपलेल्या पांडवांवर हल्ला करून त्यांना ठार मार. आणि ती सुवार्ता सांगायला माझ्याकडे लवकर निघून ये."

"दुर्योधना, कल्पना उत्तम! पण रात्रीच्या वेळीं हल्ला करणें हें धर्मसंमत नाहीं." द्रोणपुत्र अश्वत्थामा चटकन बोलून गेला.

"अश्वत्थाम्या, या युद्धांत धर्मसंमत अशा कोणत्या गोष्टी घडल्या? तुझ्या पित्यावर, गुरु द्रोणाचार्यांवर पांडवांनीं बेसावधपणेंच शरसंधान केलें ना? भीमानें गदायुद्धाचा नियम मोडून

माझ्या कटीखालीं प्रहार केलाच ना ? " दुर्योधनानें अश्वत्थाम्याची सूडबुद्धि जागृत केली. आणि अश्वत्थामा तें कुकर्म करण्यासाठीं सिद्ध झाला.

मध्यरात्रींच्या समयीं तो पांडवांच्या शिबिरांत शिरला आणि समोर दिसेल त्याचा तलवारीनें छेद करीत तो पांडवांच्या



तंबूकडे वळला. तंबूची रेशमी कनात फाडून त्यानें आंत प्रवेश केला आणि त्याच्या आनंदाला पारावार राहिला नाहीं. समोरच्या पांच रत्नजडित मंचकांवर पांच भव्य आकृति शांतपणें झोंपलेल्या त्याच्या दृष्टीस पडल्या. त्यानें सपासप "हा धर्म, हा भीम, हा अर्जुन, हा नकुल आणि हा सहदेव !" असें उच्चारीत त्या पांचहि निद्रिस्त व्यक्तींना कंठस्नान घातलें. आतां त्याच्या डोळ्यांत खून चढला होता. त्यानें धृष्टद्युम्नाचा तंबू हुडकून काढला आणि त्यालाहि क्षणार्धात ठार केलें.

आपण पित्याच्या वधाचा सूड घेतला आणि दुर्योधनाची इच्छा पूर्ण केली असें त्याला वाटूं लागलें. त्यानें सारें शिबिर पेटवून दिलें आणि तो गुपचूपपणें तेथून निघून गेला. आजूबाजूच्या झाडांवरील घुबडें ओरडूं लागलीं. कुत्रीं केंकाटूं लागलीं. स्त्रिया, मुलें, दासदासी तंबूबाहेर पडून आक्रंदत इतस्ततः धांवूं लागलीं. कांहीं घटकांपूर्वीं जेथें आनंदोत्सव साजरा झाला तेथें मृतांचीं प्रेतें हुडकून काढून पांडवस्त्रिया आक्रोश करूं लागल्या. त्या शिबिराला स्मशानभूमीचें स्वरूप आलें. सुभद्रा, कुंती आदि राजस्त्रियांनीं जेव्हां पेटलेल्या पांडवांच्या तंबूंमधून अश्वत्थाम्याच्या तलवारीला बळी पडलेले ते पांच मृतदेह सेवकांकडून बाहेर आणविले तेव्हां त्या धाय मोकलून रडूं लागल्या. ते पांचहि द्रौपदीचे पुत्र होते. पांचहि पांडवांऐवजीं ते त्या रात्रीं पांडवांच्या मंचकावर निद्रिस्त झाले होते. अश्वत्थाम्यानें त्यांनाच ठार केलें होतें.

"बाळांनो, असे कसे रे आम्हांला दुःखांत लोटून तुम्ही गेलांत? कोण्या दुष्टानें हा दावा साधला?" त्या दोघींना आपलें दुःख आवरेनासें झालें. तितक्यांत एक सेवक म्हणाला, "ज्याच्या मस्तकावर तेजस्वी असा एक मणि आहे, ज्यानें गळ्यांत यज्ञोपवीत घातलेलें आहे असा एक दुरात्मा आम्हीं मघां येथून निसटून जातांना पाहिला."

इकडे उपप्लव्य नगरांत श्रीकृष्णासह पांचहि पांडवांनीं आणि द्रौपदीनें देवीचें दर्शन घेतलें आणि ते गतगोष्टींना उजळा देत शिबिराकडे परतण्याच्या गोष्टी बोलूं लागले. इतक्यांत एक दूत घाबऱ्या घाबऱ्या तेथें आला आणि म्हणाला,

"महाराज घात झाला! कोणी पाप्यानें आपलें शिबिर काल मध्यरात्रीं पेटवून दिलें आणि कितीतरी निद्रिस्त वीरांना कंठस्नान घातलें!"

"कोणाचे हात हें दुष्ट कर्म करायला धजावले ?" भीम संतापून ओरडला.

"हे श्रेष्ठ पांडवांनो, तुम्ही सत्वर माघारीं चला." श्रीकृष्णानें त्यांना आदेश दिला. आणि चिंताक्रांत झालेले ते पांचहि पांडव मूकपणें आपला मार्ग आक्रमूं लागले. शिबिरापाशीं येतांच त्या जागेला आलेली स्मशानकळा त्यांनीं अवलोकिली. द्रौपदी त्वरेनें रथांतून खालीं उतरली आणि जेथें इतर स्त्रिया जमल्या होत्या तिकडे गेली. तिच्या आगमनाबरोबर सुभद्रा, कुंती मोठमोठ्यानें आक्रोश करूं लागल्या. त्यांनीं त्यांच्यासमोर आच्छादून ठेवलेले मृतदेह द्रौपदीला दाखविले आणि मग द्रौपदीच्या दुःखाला पारावार राहिला नाहीं. तिचें मातृहृदय पुत्रशोकानें विव्हल झालें. ती म्हणूं लागली,

"बाळांनो, रणांगणावर लढतां लढतां तुम्हांला मरण आलें असतें तर मी स्वतःला धन्य समजलें असतें. पण तुम्हांला असें किड्यामुंगीप्रमाणें कोणी रे चिरडलें ? कोण्या पाप्या ी शक्ति तुमचे प्राण हिरावून घेऊं शकली ? बाळांनो, काल सकाळीं किती आनंदांत तुम्ही माझ्यासमोर बसलां होतांत ! आपण राजसूय यज्ञ करायच्या गोष्टी बोलत होतों ! मग तो सगळा सोहळा व्हायच्या आंतच तुम्ही कसे रे मला सोडून गेलांत ? मी तुम्हांला देवदर्शनाला नेलें नाहीं म्हणून का तुम्ही असे रागावलांत माझ्यावर आणि स्वतःच देवाच्या भेटीला गेलांत ? बाळांनो, तुम्ही पांडवकुलाचा आधार ! माझे पंचप्राण ! आतां मी कशी जगूं ? काय करूं ?"

द्रौपदीचा शोक तेथें जमलेल्यांना पहावत नव्हता, ऐकवत नव्हता. एका मातेनें अंतःकरण पिळवटून काढलेले दुःखोद्गार होते ते !

भगवान् श्रीकृष्णांनीं सारा प्रकार जाणला. 'नक्कीच अश्वत्थाम्याचें काम!' त्यांची खात्री झाली. त्यांनीं पांडवांना सांगितलें, "अश्वत्थाम्यानेंच हें कुकर्म केलें. पित्याच्या वधाचा सूड घेण्यासाठीं आणि दुर्योधनावरील निष्ठेसाठीं!"

अश्वत्थाम्याचें नांव ऐकतांच भीमानें आपला रथ सज्ज केला आणि तो त्याला पकडण्यासाठीं निघून गेला. श्रीकृष्णांनीं द्रौपदीचें सांत्वन केलें आणि लगेच त्यांच्या लक्षांत आलें कीं, अश्वत्थामा ब्रह्मास्त्र सोडूं शकतो. जर कां त्यानें तें अस्त्र भीमावर सोडलें तर द्रौपदीला पुत्रशोकाबरोबर भीमासाठींहि शोक करावा लागेल. पांडवांमधें ब्रह्मास्त्रविद्या एकट्या अर्जुनाखेरीज कुणालाच माहीत



नव्हती. द्रौपदीला तशा शोकाकुल अवस्थेंत सोडून राजनीतिनिपुण श्रीकृष्ण त्वरेनें रथांत जाऊन बसले आणि त्यांनीं अश्वत्थाम्याचा पाठलाग चालविला. इकडे आदल्या रात्रीं केलेल्या पराक्रमाचें (?) वर्णन अश्वत्थाम्यानें दुर्योधनाला ऐकविलें आणि तो म्हणाला,

"दुर्योधना, आतां तरी तुझ्या चित्ताला शांति लाभेल ना?"

"नाहीं, अश्वत्थाम्या! तुझा पराक्रम खरा आहे, तरी पण तूं मारलेल्या पांच व्यक्ती पांडव नव्हेत. जोंपर्यंत श्रीकृष्ण यांच्या बाजूनें उभा आहे तोंपर्यंत पांडवांचा संहार कोणी करूं शकणार

नाहीं. अरे, भीष्म, द्रोण, कर्ण, दुःशासन, जयद्रथ, शाल्व हे सारे काय कमी पराक्रमी होते? पण त्यांची गति काय झाली? पांडवांना असें मरण अशक्य!" दुर्योधन बोलला.

"मग पांडवांच्या मंचकावर झोंपलेल्या पांच व्यक्तींना मी अंधारांत ठार केलें त्या कोण?"

"ते त्यांचे पुत्र असणार! अश्वत्थाम्या, पांडवपुत्र असणार!" दुर्योधन कळवळून म्हणाला.

अश्वत्थामा पांडवांच्या शिबिराकडे गेला तेव्हांच दुर्योधनाला असें वाटूं लागलें होतें कीं, आपली इच्छा अश्वत्थामा पुरी करूं शकणार नाहीं. कारण पांडवांचा सखा भगवान् श्रीकृष्ण आपल्या छातीचा कोट करून त्यांच्या रक्षणासाठीं उभा आहे.

त्यांचें हें बोलणें संपतें न संपतें तोच रथांचा खडखडाट त्यांच्या कानीं आला आणि त्यापाठोपाठ भीमार्जुनांचें दर्शन त्यांना घडलें. त्यांना पहातांच अश्वत्थाम्यानें आपलें धनुष्य सज्ज केलें आणि ब्रह्मास्त्राचा मंत्र जपून त्यानें तो बाण पांडवांच्या दिशेनें सोडला. अर्जुनहि सावध होताच. त्यानेंहि त्या अस्त्राला प्रत्युत्तर म्हणून ब्रह्मास्त्र सोडलें. आणि पृथ्वीवर अग्निप्रलय होणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं. दोन्ही अस्त्रें एकमेकांजवळ येत चाललीं, तसा त्या वनाला प्रचंड वणवा लागला आणि त्या भडकलेल्या युद्धभूमीवर दोन असामान्य वीरांचें तुंबळ युद्ध चालू झालें. बराच वेळपर्यंत अश्वत्थाम्यानें निरनिराळ्या अस्त्रांचा भडिमार अर्जुनावर चालविला. पण अर्जुनानें ते सगळे बाण परतवून लावले. शेवटीं अश्वत्थाम्याजवळ असें एकहि शस्त्र वा अस्त्र उरलें नाहीं कीं, ज्याचा उपयोग तो अर्जुनाशीं लढण्यासाठीं करूं शकेल. तेव्हां जीवाच्या भयानें तो अर्जुनासमोरून पळूं लागला.

मग अर्जुन व भीम दोघेहि रथाखालीं उतरले. आणि त्यांनीं अश्वत्थाम्याला पकडलें. भीम त्याची मान आवळणार इतक्यांत अर्जुनानें भीमाला अडविलें. तो म्हणाला, ''भीमा, अश्वत्थाम्याला शासन करण्याचा अधिकार आपला नाहीं. तो कसाहि वागला असला तरी आपला गुरुपुत्र आहे. आपण त्याचा वध करणें उचित नाहीं. ज्या सती साध्वीला यानें दारुण पुत्रशोकांत लोटलें आहे अशा द्रौपदीकडे याला आपण घेऊन जाऊं."

अर्जुनाचें हें सांगणें भीमानें ऐकलें. त्यानें अश्वत्थाम्याला करकचून बांधलें आणि त्याला फरफटत आपल्या रथापर्यंत आणलें. आदल्या रात्रींचा क्रूर अश्वत्थामा यज्ञांत बली म्हणून देण्यांत येणाऱ्या पशूप्रमाणें दीनपणें बसून राहिला. सबंध वाटेनें भीम आणि अर्जुन यांनीं त्याची "अधम" म्हणून निर्भर्त्सना केली. " आमच्या कुलाचा संहारच करायचा होता तर कुरुक्षेत्रावर कां नाहीं तूं आपलें तेज प्रकट केलेंस ? असा भ्याडासारखा मध्यरात्रीं येऊन आमच्या पुत्रांचा कां वध केलास ?"

अश्वत्थामा कांहीं एक बोलला नाहीं. त्यानें फक्त विकट हास्य केलें. त्या हास्यामुळें भीमाचा राग अनावर झाला. अश्वत्थाम्याला आपल्या दुष्कृत्याचा पश्चात्ताप झालेला नसून, उलट राक्षसी आनंदच झालेला आहे हें पाहून भीमानें त्याच्या नरडीचा घोट घेण्याचें ठरविलें. तो रथांतल्या रथांतच अश्वत्थाम्यावर तूटून पडला. परंतु श्रीकृष्ण मधें पडले. त्यांनीं भीमाला परत बजावलें

"भीमा, ह्या दुष्टाला शासन करण्याचा अधिकार आपला नाहीं. ज्या मातेला ह्यानें शोकसागरांत लोटून दिलें आहे तीच याचा न्याय करील."

अनुक्र. ०६८७०४ .. वि. आ.वा...

क्रमांक 30/3/09 ....नोंद दि........ 30/3/09

त्यांचा रथ उध्वस्त शिबिरा समोर येऊन थांबला. अश्वत्थाम्याला भीमार्जुनांनीं पुरता जखडून टाकला होता. त्यांनीं त्याला ओढीत फरफटत द्रौपदीसमोर आणला. द्रौपदीचा कोमल सुकुमार चेहरा शोकानें काळवंडून गेला होता. प्रत्येक पुत्राची आठवण काढीत तिनें अश्रुपात केल्यानें तिचीं उंची वस्त्रें भिजून चुरगळून गेलीं होतीं. रडून रडून तिचे डोळे लाल झाले होते आणि सुजले होते. भगवान श्रीकृष्ण पुढें झाले आणि त्यांनीं द्रौपदीला म्हटलें, "पांचाली, शोक आवर. तुझ्या सुपुत्रांना अधर्मानें ठार करणाऱ्या अधमाला तुझ्या पतींनीं पकडून आणलें आहे. त्याला काय शासन करायचें तें तूंच ठरव." अश्रूंचा पडदा डोळ्यांवर ओढून द्रौपदीनें आपली मान वर केली आणि तिच्या पतींनीं बांधून आणलेल्या, खालीं मान घालून उभ्या असलेल्या व्यक्तीकडे तिनें पाहिलें.

"कोण ? द्रोणपुत्र अश्वत्थामा ?" ती आश्चर्यानें उद्गारली. आणि पांडवांकडे वळून ती म्हणाली, "हा आपला गुरुपुत्र आहे. ह्याला नरबली देतात तसें जखडून ठेवूं नका. ह्याला मुक्त करा."

तिच्या इच्छेवरून अश्वत्थाम्याला मुक्त करण्यांत आलें. ती म्हणाली, "गुरु द्रोणाचार्यच पुत्ररूपानें येथें उपस्थित झाले आहेत असा भास क्षणभर मला झाला. हे ब्राह्मणकुलोत्पन्ना, सांग, माझ्या पुत्रांनीं तुझा काय अपराध केला म्हणून तूं त्यांचा असा शेवट केलास ? असलें निंद्य कृत्य करतांना तुला मुळींसुद्धां लाज कशी वाटली नाहीं ?"

"द्रौपदी, त्याची निर्भर्त्सना तुझ्यासारख्या श्रेष्ठ स्त्रीनें करावी आणि उगाच आपले शब्द वायां घालवावे असें मला वाटत नाहीं. तुझ्या पुत्रांचा यानें वध केला आहे, तेव्हां त्याला काय शिक्षा करावी तेवढें सांग." भीम उसळून म्हणाला.

त्यावर द्रौपदीनें शांतपणें सांगितलें, " मी मनांत आणीन तर याचे हालहाल करून ह्याला ठार मारा, अशी इच्छा मी प्रकट करूं शकेन. ह्याला जिवंत जाळा, ह्याच्या अवयवांचे तुकडे तुकडे करा असें म्हणूं शकेन. पण माझ्यानें तें होणार नाहीं. आपण सारे असे अवाक् होऊन माझ्याकडे पाहूं नका. पण खरेंच सांगतें, माझ्यानें याला मृत्युदंडाची शिक्षा दिली जाणार नाहीं." द्रौपदी रडत रडत सांगूं लागली. " माझ्या पुत्रांचे मृतदेह कवटाळून मीं इतका वेळ शोक करतें आहें. पुत्रविरहाचें दुःख काय असतें हें समजायला माताच व्हायला पाहिजे. मी तें दारुण दुःख भोगतें आहें. त्याच्या वेदना काय असतात हें मी समजलें आहें. म्हणूनच मला वाटतें याला शिक्षा देऊन आपण आणखी एका



मातेला तिच्या पुत्रापासून वंचित करूं नये. माता कृपीची मला दया येते. अश्वत्थाम्याला ठार करून तिचा पुत्र तिच्यापासून कायमचा हिरावून घ्यावा असें मला वाटत नाहीं. पण ..."

दुसऱ्या मातेचें दुःख नुसत्या कल्पनेनें जाणणारी द्रौपदी बोलली. ती मनांत आणती तर अश्वत्थाम्याचे तिथल्या तिथें

तुकडे झाले असते. पण तिच्या मातृहृदयानें आणखी एका मातेचें हृदय जाणलें आणि त्यामुळेंच घोर अपराध करूनहि अश्वत्थामा पांडवांच्या शिबिरांतून जिवानिशीं बाहेर पडूं शकला. "पण या कुपुत्राला शिक्षा मात्र व्हायला हवी. यानें दुसऱ्याच्या आईला निष्कारण दुःख दिलें आहे. कायमचें दुःखांत लोटलें आहे, तेव्हां याला मरेपर्यंत दुःखांत सडत रहाण्याची शिक्षा मी सांगत्यें. याच्या डोक्यांतला मणि काढून घ्या 'आणि फुटलेल्या मस्तकाचा हा मुर्दाड माणूस मरेपर्यंत रानावनांत आपलें दुःख भोगीत हिंडूं द्या." द्रौपदीनें अखेर सांगितलें.

* *

# ३६ सुप्रियाचा मार्ग

बालमैत्रिणींनो,

एक होता लांकूडतोड्या. तो रोज उठून रानांत जायचा आणि आपल्या लोखंडी कुऱ्हाडीनें लांकडें तोडायचा. तोडलेल्या लांकडाच्या मोळ्या बांधून तो त्या मोळ्या बाजारांत नेऊन विकायचा. आणि येतील त्या पैशावर आपली गुजराण करायचा.

माहिती आहे यापुढची गोष्ट तुम्हांला ?...आठवल्यासारखी, ऐकल्यासारखी वाटत्येय ? मी सांगायला तर सुरुवात करतें म्हणजे तुम्हांला नक्की आठवेल. एकदां काय झालें, लांकडें तोडतां तोडतां त्या लांकूडतोड्याची कुऱ्हाड पाण्यांत पडली. त्याचें कामच अडलें. आतां तो मोळ्या कशाच्या बांधणार आणि पैसे कशावर मिळविणार? बिचाऱ्याला पुढचे सगळे हाल आठवून रडूं कोसळलें. तिकडून शंकर-पार्वती चाललीं होतीं. त्यांनीं त्या लांकूडतोड्याचें रडणें ऐकलें. त्यांना त्या बिचाऱ्याची दया आली. आठवली ना आतां सगळी गोष्ट? शंकर-पार्वतींनीं त्याला सोन्याची, रुप्याची कुऱ्हाड दाखविली, पण त्यानें त्यांना हात लावला नाहीं. आपली होती ती लोखंडाचीच कुऱ्हाड मागून घेतली. लांकूडतोड्याचें संकट दूर झालें कारण शंकर-पार्वतींना त्याची दया आली.

मनुष्य संकटांत सांपडला कीं त्याच्याविषयीं सहानुभूति बाळगणाऱ्यांना त्याला मदत करतांना जी भावना निर्माण होते

तीच दया. "दया तिचें नांव भूतांचें पालन" असें म्हटलें आहे. दुसऱ्याबद्दल सहानुभूति दाखविली, अनुकंपा वाटली तर त्याचें संकटनिवारण करण्यासाठीं पुढें सरसावावेंसें वाटतें. तसें पुढें होऊन असे महाभाग जगाचीं दु:खें कमी करण्याचा प्रयत्न करतात.

अपराधी अश्वत्थाम्याला द्रौपदीनें सोडून दिलें, कारण तिला कृपीची-अश्वत्थाम्याच्या आईची दया आली. 'मी भोगतें आहें तसें दु:ख त्या आईच्या वांटयाला येऊं नये' म्हणून तिनें अश्वत्थाम्याला जीवदान दिलें. द्रौपदीनें आईचें हृदय जाणलें. अशीच एक सुपुत्री या भारतांत भगवान बुद्धांच्या काळांत जन्माला आली. सुप्रिया तिचें नांव. आईचें हृदय घेऊन जन्माला आलेल्या सुप्रियानें तर हजारों जीवांना जीवदान दिलें. त्या हजारोंत अश्वत्थाम्यासारखे दुष्ट होते आणि धर्मराजासारखे सज्जनहि! सुप्रियाचें अंत:करण त्या साऱ्यांसाठीं सारखेंच द्रवलें. आणि ती आपल्या थोर कृतीनें या भूमींत प्रसिद्धी पावली.

सुप्रिया ही अनाथपिण्डक नांवाच्या धनवान् व्यापाऱ्याची एकुलती एक मुलगी होती. चेहरा पौर्णिमेच्या चंद्रासारखा वाटोळा गोल, नाक व डोळे ठसठशीत आणि चेहऱ्यावर असा कांहीं स्निग्ध भाव पसरलेला कीं पाहणाराला वाटावें ह्या मुलीजवळ आपल्या अडचणी सांगून आपलें दु:ख हलकें करावें. सुप्रिया आपल्या पित्याची अतिशय लाडकी होती. अनाथपिण्डक रोज तिला दोन सुवर्णमोहरा देत असे. त्या सुवर्णमोहरा घेऊन सुप्रिया कधीं धान्य-धुन्य, तर कधीं कपडेलत्ते खरेदी करी. आणि धान्याची रास किंवा कपडयांचा ढीग आपल्या डाव्या हाताशीं ठेवून ती वाडयाच्या महाद्वाराशीं बसत असे. मग तिच्या दारावरून जे जे अनाथ, गरजू पीडित लोक जात त्यांना त्यांना सुप्रिया गरजेपुरतें अन्नवस्त्र

देत राही. सुप्रियाची ही परोपकारी वृत्ति पाहून अनाथपिण्डकाला समाधान लाभत असे. जो काय दानधर्म करायचा तो सुप्रियाच्या हातांनीं असा जणुं त्याचा नियमच ठरून गेला. वाड्यांत काम करणारे जे नोकरचाकर, दासदासी असत ते नि:संकोचपणें सुप्रियाला आपल्या अडचणी सांगत. कोणी म्हणे, " सुप्रियाताई, आज घरांत धान्याचा दाणा नाहीं ग ! " सुप्रिया तिला दोन-चार दिवस पुरेल एवढें धान्यधुन्य देई.

दुसरी कोणी म्हणे, "सुप्रियाताई, माझ्या तान्ह्या बाळाला निजवायला एखादं ऊबदार पांघरूण नाहीं ग ! " कीं सुप्रिया तिला आपल्या घरांतील एखादा ऊबदार कपडा आणून देई. सुप्रियाच्या या प्रेमळपणानें मदत करण्याच्या वृत्तीमुळें सर्वच तिच्यावर प्रसन्न असत. सुप्रिया दयामयी देवता आहे असें ते सर्व म्हणत. लोकांच्या आदराला पात्र झालेली सुप्रिया अशी होती तरी केवढी? वीस-पंचवीस वर्षांची ? छे: ! ती होती सारी बारा वर्षांची मुलगी ! पण पन्नास वर्षांच्या गृहिणीच्या बुद्धीनें तिचा हात चालत होता.

एक दिवस काय झालें, सुप्रिया नेहमींप्रमाणें आपल्या पित्यानें दिलेल्या सुवर्णमोहरांचें धान्य आणून गरजूंना त्याचें वांटप करीत आपल्या घराच्या महाद्वारांत बसली होती. इतक्यांत एक मनुष्य खांद्यावर दोन कोकरें वाहून नेत असलेला तिनें पाहिला.त्या कोकरांचें पांढरें स्वच्छ अंग आणि गोजिरवाणे चेहेरे पाहून सुप्रिया " ए, ए," असें म्हणून ओरडली. कोकरें घेऊन जाणाऱ्या त्या माणसानें तिच्याकडे पाहिलें. सुप्रिया आपली भरली मूठ पुढें करून म्हणाली, " किती सुंदर कोकरें आहेत रे ! हे घे त्यांना मूठ मूठ गहूं. " तो मनुष्य सुप्रियाच्या बोलावण्यासरशी तिच्यापाशीं आला. धान्य पहातांच त्याच्या खांद्यांवरील कोकरांनीं धडपड करीत खालीं

उडच्या टाकल्या. आणि तीं सुप्रियाच्या हातांतील गहूं पहिल्यांदां खाण्यासाठीं एकमेकांना बाजूला ढकलूं लागलीं. त्याचें तें भांडण पाहून सुप्रियानें आपल्या दोन्ही हातांत गहूं घेतले आणि त्या अजाण कोकरांचें भांडण मिटविलें. नंतर त्या मनुष्याकडे वळून ती म्हणाली, " नांव काय रे तुझें ?"



"धर्मा." आपलें मुंडासें सांवरून तो उत्तरला.

"हीं कोकरें तुझीं आहेत?"

"हो. पण आतां मी तीं घेऊन एका श्रीमंत माणसाकडे चाललों आहें. तो उद्यां कसलासा यज्ञ करणार आहे. त्या यज्ञांत बळी देण्यासाठीं त्याला हीं कोकरें हवीं आहेत. तो माझ्याकडे आला आणि त्यानें कोकरें मागितलीं. आपल्याला काय, दोन कोकरांचें मोल मिळाल्याशीं कारण ! आणि शिवाय हीं कोकरें तुमच्या आमच्यापेक्षां सुद्धां भाग्यवान् ! यज्ञांत बळी पडायला सुद्धां भाग्य लागतें !

धर्मा आणखी बोलतच राहिला असता. पण सुप्रियानें त्याला अडविलें, " इतक्या सुंदर कोकरांना तूं केवळ चार पैसे मिळतात. म्हणू बळी देणार ? " सुप्रियानें कळवळून त्याला विचारलें.

" मग आम्ही काय करावें ? अशी यांची दया येऊन ह्यांना घरींच घेऊन बसलों तर चार पैसे कसे मिळतील ? "

"पैशाचाच प्रश्न असला धर्मा, तर मी देतें तुला या कोकरांची किंमत. बोल किती देऊं ? " सुप्रियानें त्या कोकरांना गोंजारीत विचारलें. इथल्या इथेंच पैसे मिळतात, या कल्पनेनें धर्माला बरें वाटलें. त्यानें त्या कोंकराची किंमत सांगितली दोन रुप्याच्या मोहरा.

त्याला थांबायला सांगून सुप्रिया तशीच आंत गेली आणि अनाथपिण्डकाला म्हणाली, "पिताजी, लवकर दोन रुप्याच्या मोहरा द्या मला."

"कशाला ग आत्तांच ?"

" मला कोकरें घ्यायचीं आहेत ? "

"कोकरें ? अन् तीं कशासाठीं ?"

"हो,तो धर्मा त्यांना बळी देण्यासाठीं घेऊन निघाला आहे त्यांना सोडविण्यासाठीं."

"कुठें आहेत तीं ?"

"बाहेरच तर आहेत. बाबा, इतकीं गोजिरवाणीं आहेत तीं दोन्ही कोकरें ! मी तर इतका वेळ त्यांच्याकडे पहात बसलें होतें. इतक्या सुंदर कोकरांना मारे ऐटींत ते लोक शेंदूर गुलाल फांसणार आणि त्यांच्या मानेवर सुरी चालवणार. अयाई ग ! "

अनाथपिंडकानें लेकीशीं बोलणें चालू असतांनाच एकीकडे दोन रुप्याच्या मोहरा काढल्या आणि तिच्या हातावर ठेवल्या. सुप्रिया गडबडीनें बाहेर आली. धर्मा तिची वाट पहात बाहेर उभा होताच. त्याच्या हातीं रुप्याच्या मोहरा देत सुप्रियानें त्या दोन्ही कोकरांना कवटाळलें आणि त्यांच्यासह ती घाईघाईनें आंत परतली. त्या कोकरांना तिनें थोडें दूध पाजलें आणि दिवसभर त्यांच्याशीं खेळण्याबागडण्यांत ती दंग होऊन गेली. त्यानंतरचे कांहीं दिवस

सुप्रियाचा हा उद्योगच होऊन बसला कीं कुणी यज्ञांत बळी द्यायला एकादें कोंकरूं, एकदां बकरा चालविला असला तर त्या निरपराध जीवाची हत्या होऊं नये म्हणून धडपडायचें. तिच्या दयाळु अंतः-करणाला यज्ञांत पशुबळी देतात ही गोष्टच पसंत नव्हती. सुप्रि-याच्या या विचारांचा अनाथपिण्डकावर फार परिणाम झाला. त्याला वाटूं लागलें कीं जें सुप्रियासारख्या बारा वर्षांच्या मुलीला कळतें तें इतरांना कां कळूं नये? यांतून योग्य मार्ग दाखवील असा एखादा महात्मा नाहीं का,कीं जो यज्ञयागाखेरीज मोक्षाचा दुसरा एखाद मार्ग लोकांना दाखवून येईल.

अनाथपिण्डकाची हा प्रार्थना जणुं देवानें ऐकली. महात्मा गौतमबुद्ध आपल्या शिष्यपरिवारासह हिंडत हिंडत जेतवनांत निवा-साला उतरले होते. त्यांनीं यज्ञयाग, पशुबली याची गरज नाहीं असें सांगून अहिंसेची शिकवण द्यायला सुरवात केली होती. त्यांच्या या शिकवणीचा योग्य तो परिणामहि दिसायला लागला होता. त्यांना हजारोंनीं अनुयायी मिळाले होते.

गौतमबुद्धांनीं त्या अनुयायांचे संघ स्थापन केले. त्यांच्या-साठीं मठ बांधले, विहार खोदले आणि शुद्धाचरण, ब्रह्मचर्यपालन इत्यादि आचारांवर भर दिला. स्त्रियांनीं सुद्धां त्यांच्या या नवीन संप्रदायाची दीक्षा घेतली. त्यांत अग्रस्थान होतें गौतमबुद्धाला जिनें लहानाचा मोठा केलें त्या महाप्रजापति गौतमीला. महाप्रजा-पतीनें हजारों स्त्रियांना गौतमबुद्धाची शिकवण सांगितली. अहिंसा, निर्वैरता, शुद्धाचरण, परोपकार यांची महत्ती ज्या स्त्रियांना पटली त्या संसारबंधनें तोडून भिक्षुणी बनल्या. मठांत राहूं लागल्या. बुद्धदेवाच्या आदेशानुसार प्रांतोप्रांतीं जाऊन या नव्या संप्रदायाचा प्रसार करूं लागल्या.

बुद्धदेवांसमवेत जेतवनांत महाप्रजापति गौतमीहि आली होती. बरोबर शिष्यसमुदायहि होता. जवळच्याच श्रावस्तीनगरींतून कितीतरी पौरजन बुद्धांना पहाण्यासाठीं, त्यांचीं प्रवचनें ऐकण्यासाठीं येऊं लागले होते. अनाथपिण्डकहि त्यांच्यापैकींच एक होता. त्यानें बुद्धदेवांच्या मुखांतून जेव्हां अहिंसेची शिकवण ऐकली, प्राणिमात्रावर दया करा, त्यांना वळी देऊन मोक्षप्राप्ति होईल असें समजूं नका याबद्दलचें प्रवचन जेव्हां ऐकलें तेव्हां त्याच्या आनंदाला पारावर राहिला नाहीं. त्याला वाटूं लागलें—आपण उठावें आणि बुद्धदेवांला सांगावें–" देवा, संसारत्याग न करतांहि मी तुमच्या धर्माचीं तत्त्वें अंमलांत आणतों आहें. माझी सुप्रिया तर करुणेची, दयेची साक्षात् मूर्ति आहे. तिनें लहान वयांतच कितीतरी जीवांवर दया दाखविलेली आहे. "

पण एवढ्या प्रचंड जनसमुदयासमोर उठून दूरवर एका वृक्षराजींत बसलेल्या गौतमाबरोबर बोलण्याचें धाडस त्या बिचाऱ्याला झालें नाहीं. थोड्याच काळांत बुद्धाचें प्रवचन संपलें. आजूबाजूहून तेथें आलेले लोक पांगले आणि घरचा रस्ता सुधारूं लागले. अनाथपिण्डक मात्र उठला आणि घरीं न जातां बुद्धदेव ज्या वृक्षाखालीं बसले होते तेथें येऊन उभा राहिला.

बुद्धदेवांच्या भोंवतालीं त्याचे दोनचार मुख्य शिष्य आणि महाप्रजापति गौतमी होती. अनाथपिण्डकानें नम्रपणें बुद्धदेवांना अभिवादन केलें आणि म्हटलें, " महाराज, ज्या तत्त्वांची शिकवण देत आपण गावोगांव हिंडतां आहांत तीं तत्त्वें जर एकादी व्यक्ति पूर्वीपासूनच अंमलांत आणीत असेल तर तिलाहि आपण सर्वसंगपरित्याग करून भिक्षु व्हायला सांगणार का? "

" अहिंसा, भूतदया, निर्वैरता ह्या गोष्टी अशा आहेत कीं ज्या संसारांत राहून आचरणांत आणणें अशक्य आहे. " बुद्धदेव

गंभीरपणें म्हणाले. "मला वाटतें, संसारांत राहूनहि या गोष्टी सहजसाध्य आहेत." अनाथपिण्डक उत्तरादाखल हें धीटपणें बोलला तेव्हां त्याला सुप्रियेची आठवण होत होती.

"महोदय, आपण संसारांत राहिलांत कीं मोक्षप्राप्तीसाठीं, सुखप्राप्तीसाठीं यज्ञयाग, व्रतवैकल्यें करतां. ब्राह्मणांना बोलावून मंत्रविधि करून यज्ञांत पशुबली देतां आणि एवढें करूनहि आपल्याला शांति लाभत नाहींच. हा माझ्यापेक्षां अधिक श्रीमंत, तो अधिक भाग्यवान् अशी तुमची विचारसरणी असते. पर्यायानें तुम्ही लोभी, मत्सरी बनतां. म्हणून अहिंसेचें, भूतदयेचें पालन करण्यासाठीं संसारत्याग ही पहिली पायरी आहे." बुद्धदेवांच्या मुद्रेवरचे शांत भाव यत्किंचितहि कमी झाले नाहींत.

अनाथपिण्डकानें आपली नम्रता न सोडतां, बुद्धदेवाला पुन्हां सांगितलें, "देवा, आपण ज्ञानी सत्पुरुष आहांत. आपल्यासारख्यांच्या समोर मी काय बोलावें? पण जिच्या शुद्धाचरणानें, निर्वैर दयाळु स्वभावामुळें, मी हें सारें आपण या जेतवनांत यायच्या अगोदर शिकलों, ती माझी कन्या संसारांत राहूनच आपण शिकविलेलीं धर्मतत्त्वें आचरीत आहे. या बाबतींत ती माझी गुरु आहे असें आपण समजा."

"काय नांव आहे आपल्या कन्येचें?" महाप्रजापतीनें कौतुकानें विचारलें.

"सुप्रिया!"

"वा नांव मोठें सुंदर आहे. सुप्रिया सध्यां कोठें आहे? आपल्या सासरीं कीं माहेरीं?" महाप्रजापतीनें पुन्हां एकदां प्रश्न केला.

"माते, माझी कन्या अजून माझ्या घरींच आहे. तिचें वय अवघें बारा वर्षांचें आहे." अनाथपिण्डकानें त्याच्यासमोर बसलेल्या साऱ्यांना या माहितीनें चांगलाच धक्का दिला.

"सुप्रिया फक्त बारा वर्षांची आहे?" महाप्रजापतीनें खात्री करून घेण्यासाठीं विचारलें. अनाथपिण्डकानें उत्तरादाखल मान डोलावली. "आणि तरीहि तिला अहिंसा, भूतदया, निर्वैरता हीं धर्मांचीं तत्त्वें माहीत झालीं?" गौतमी आश्चर्यांत बुडून गेली.

"माते, एकादें धर्मतत्त्व म्हणून तिनें तें अंगिकारलेलें नाहीं. पण दयेच्या अथांग सागरांतून हीं मोत्यें आपोआप तिच्या वांटचाला आलीं आहेत. तिनें श्रावस्तींतील कितीतरी अनाथ गरजू जीवांना मदत केली आहे. दु:खितांचे अश्रू पुसले आहेत. बळी जायला निघालेले निष्पाप, अजाण, मूक असे अनेक जीव वांचविले आहेत. सुप्रिया माझी कन्या असली तरी माझी गुरु आहे." अनाथपिण्डक तिच्या आठवणीनेंच गहिंवरला.

इतका वेळ शांतपणें बसलेले बुद्धदेव अनाथपिण्डकाला म्हणाले, "आपल्या कन्येला भेटण्याची इच्छा आहे. आपल्या नगरांत केव्हां येऊं?"

"महाराज, तिला भेटण्यासाठीं आपण इतक्या लांब येण्याचे कष्ट घेऊं नयेत. मी स्वत: सुप्रियाला घेऊन उद्यां आपल्या भेटीला येईन." अनाथपिण्डकानें पुनश्च एकवार तेथें जमलेल्यांना अभिवादन केलें आणि तो आपल्या घरीं परतला.

दुसऱ्या दिवशीं सुप्रियेला बरोबर घेऊन अनाथपिंडक बुद्धदेवांकडे आला. सुप्रियानें बुद्धदेवांना अभिवादन केलें. तिला आलेली पाहून महाप्रजापति गौतमीला अत्यानंद झाला. तिनें

सुप्रियाला जवळ घेतलें आणि तिचा रोजचा कार्यक्रम विचारला. सुप्रिया न कचरतां सांगू लागली:



" पिताजी मला रोज दोन सुवर्णमोहरा देतात. त्यांतून मी थोडया द्रव्याचें गोरगरिबांसाठीं धान्य आणवतें आणि उरलेल्या पैशाचा उपयोग, जर कोणी पैशासाठीं कोणा जीवाची रवानगी बळी देण्यासाठीं करीत असेल तर, त्याची सुटका करण्यासाठीं करतें."

महाप्रजापतीला तिची दिनचर्या ऐकून मोठें कौतुक वाटलें. तिने बुद्धदेवांना म्हटलें, " खरेंच, हिच्यासारख्या स्त्रिया जर संसारांत असतील तर त्यांनीं संसारत्याग करून आपल्या संघांत यायला पाहिजे असें मुळींच नाहीं. अनाथपिण्डक काल जें म्हणत होते तेंच योग्य आहे."

आणि त्यानंतर बुद्धदेवांनीं आपल्या प्रवचनांतून लोकांनीं अहिंसाधर्माचें पालन करण्यासाठीं व आपल्या संप्रदायाचे अनुयायी होण्यासाठीं भिक्षु व्हायलाच पाहिजे असें नाहीं, असें प्रतिपादन करायला सुरुवात केली. त्यामुळें श्रावस्ती नगरींतील बडयाबडया

व्यापाऱ्यांनींहि त्या संप्रदायाची दीक्षा घेतली. श्रावस्तीहून ते दररोज बुद्धदेवांच्या प्रवचनासाठीं जेतवनांत येऊं लागले. त्यांमधें सुप्रिया व अनाथपिण्डक सर्वांत अग्रभागीं असत. सुप्रिया महाप्रजापतीची पट्टशिष्या बनली होती. महाप्रजापति रोज तिला कांहीं ना कांहीं नवीन ज्ञान देत होती. सुप्रिया एकचित्तानें तें ग्रहण करीत होती.

बुद्धदेवांचा मुक्काम जेतवनांत गेले सहा महिने होता. त्या काळांत लोक बहुसंख्येनें तिथें जमत होते. कोणी आपलें दुःख सांगायला; कुणी बुद्धदेवांना नुसतें पहायला, तर कुणी त्यांचें प्रवचन ऐकायला. पण हळूहळू लोकांची संख्या रोडावत चालली. चारदोन धनिक व्यापाऱ्यांशिवाय तेथें कोणी येईनासें झालें. बुद्धदेवांनीं अनाथपिण्डकाला त्याचें कारण विचारलें. अनाथपिण्डकानें उत्तर दिलें, "महाराज, गेले दोन महिने अवर्षण झाल्यानें श्रावस्ती नगरींत आणि आजूबाजूच्या गांवांत दुष्काळ पडला आहे. लोकांना खायला पुरेसें अन्न नाहीं. जो तो पोटाच्या विवंचनेंत आहे. आपल्या मुलाबाळांचें पोट भरतां येत नाहीं म्हणून दुःखी आहे. मग आपल्या प्रवचनाला कोण कसा येणार?"

"माझ्या धर्मानें तर लोकांमधील दुःख दैन्य नाहींसें करण्याचें व्रत अंगिकारलेलें आहे. धर्म यांचें दुःख दूर करील..." बुद्धदेव पुढें कांहीं बोलणार तोंच त्यांचा मुख्य शिष्य आनंद आपल्या दोन्ही हातांवर एका अर्धमृत बालकाला घेऊन तिथें उपस्थित झाला. त्या मुलाला त्यानें बुद्धदेवांसमोर आणून झोपविलें आणि तो हात जोडून उभा राहिला. त्या बालकाच्या सुकलेल्या काष्ठवत् शरीराकडे पाहून जो तो उमजला–'दुष्काळाचा बळी आहे हा!'

"ह्या बालकासाठीं कोण काय करूं शकेल?" बुद्धदेवांनीं गंभीरपणें विचारलें. सर्वजण आपल्या जागेवर चुळबूळ करीत बसले.

सुप्रिया मात्र झटकन् आपल्या जागेवरून उठली आणि त्या मुला-जवळ गेली. तिनें त्या मुलाच्या शुष्क चेहेऱ्याकडे एकदांच बघितलें आणि आपल्या-जवळचें थोडें थोडें पाणी त्याच्या मुखांत घातलें. गार पाण्याचा शिडकावा त्याच्या चेहेऱ्यावर केला. तिच्या प्रेमळ शुश्रुषेनें जणुं त्या बालकांत नवचैतन्य आलें. त्यानें आपले खोल गेलेले डोळे उघडले आणि "आई, पाणी" एवढेच अस्फुट उद्गार काढले. सुप्रिया भरल्या डोळ्यांनीं त्याच्या मुखांत पाणी घालीत होती.



बुद्धदेव, अनाथपिण्डक, महाप्रजापति या साऱ्यांनाच तिचें विलक्षण कौतुक वाटत होतें. शेवटीं बुद्धदेव तिला म्हणाले,

"एकाचीच शुश्रूषा आईच्या वात्सल्यानें करून चालणार नाहीं, सुप्रिया. अशा हजारों, अनाथ, भूकपीडितांचें रक्षण तूं केलें पाहिजेस."

सुप्रियेसह अनाथपिण्डक घरीं परतला. त्याच्या दाराशीं कितीतरी दुष्काळपीडित लोक आशेनें उभे होते. त्यांच्या दीनवाण्या मुद्रा आणि सांपळ्यासारखीं शरीरें पाहून सुप्रियेला अगदीं भड-भडून आलें. ती घाईघाईनें आंत गेली आणि बाहेर येऊन जम-लेल्या त्या साऱ्यांना थोडेंथोडें धान्य घालूं लागली. "माय माउली!

माझी" असें उद्गारत जो तो तिला दुवा देत तेथून परतूं लागला. पुढें कित्येक दिवस तिचा हा दिनक्रम चालू राहिला. पण अनाथपिण्डक कितीहि धनवान् म्हटला तरी अखेर एवढ्या साऱ्या दुष्काळपीडितांना तो थोडाच पुरा पडणार होता? सुप्रियेच्या करुणामय वृत्तीनें सगळ्याच दुष्काळपीडितांचें दुःख थोडेंच दूर होणार होतें? अनाथपिण्डकाला चिंता वाटूं लागली. त्यानें निश्चय केला–जवळपासच्या दुसऱ्या एकाद्या नगरांत जाण्याचा आणि मिळेल त्या किंमतीनें खूप धान्य खरेदी करण्याचा.

त्या दिवशीं जेतवनांत सुप्रिया एकटीच गेली होती. बुद्धदेवांना अजूनहि दुष्काळग्रस्त दुःखी जनांचें दुःख हरण करण्याचा उपाय सांपडला नव्हता. त्यांच्याभोंवतीं जमलेले सारे चिंताक्रांत नजरेनें बसले होते. त्यांत श्रावस्तीमधील तीन-चार व्यापारी धनिकहि होते. बुद्धदेवांनीं त्या सर्वांवरून एकवार नजर टाकली आणि रत्नाकर नांवाच्या एका व्यापाऱ्याला उद्देशून ते म्हणाले, "रत्नाकरशेठी, मला वाटतें लोकांचें दुःख हरण करायला तुम्ही मला मदत करूं शकाल."

"बुद्धदेव, स्पष्ट बोलण्याबद्दल क्षमा असावी. पण मी शपथपूर्वक सांगतों, मी आपली इच्छा पूर्ण करायला असमर्थ आहें. यंदां पाऊस नाहीं. त्यांत कुटुंबाचा भार माझ्या एकट्यावरच! आई, वडील, चार भाऊ, त्यांच्या बायका, त्यांचीं पोरेंबाळें, माझीं स्वतःचीं बायकामुलें एवढ्यांना खायला घालतां घालतां माझी पुरेवाट झाली आहे. माझा वाडा असला आणि शेतीवाडी असली तरी मलाहि दुष्काळ आहेच."

रत्नाकराच्या बोलण्यानें बुद्धदेवांची संपूर्ण निराशा झाली. त्यांनीं सामन्तराज जयसेनाकडे आपली दृष्टि वळविली. तोहि

रत्नाकराचाच भाऊ ! खोटें रडगाणें गाण्यांत कांकणभर त्याच्या-पेक्षां सरसच ! बुद्धदेवांनीं त्याला मदत करण्याबद्दल सुचवितांच तो एकदम ढसाढसा रडूं लागला.

"देवा, कशाला माझ्या दुःखावर डागण्या देतां ? माझी आपली झांकली मूठ होती, तीं बरी होती. लोकांना खायला-प्यायला घालावें असें मला फार वाटतें. पण खरें सांगतों, माझ्या घरांत फारसें धान्य शिल्लक नाहीं."

"पण देवा, कांहींतरी केलें पाहिजे!" रत्नाकर शेठी मध्येंच म्हणाला.

"हो ना! नाहींतर, सगळा प्रदेश उजाड होईल. हाडांच्या सापळ्यांखेरीज कांहीं दृष्टीला पडणार नाहीं." जयसेन उद्गारला.

बुद्धदेव कांहींच बोलले नाहींत. ते डोळे मिटून विचारमग्न अवस्थेंत बसून राहिले. त्यांची समाधि लागली आहे असें समजून ते दोघे व्यापारी हलकेच उठून तिथून निघून गेले. ते गेल्यावर बुद्ध-देवांनीं डोळे उघडले आणि ते म्हणाले, "काय, एवढ्या साऱ्यांत कोणीहि समर्थ नाहीं लोकांना मदत करायला? माझ्या धर्माची दीक्षा घेऊनहि कोणाचें अंतःकरण द्रवत नाहीं दुष्काळग्रस्तांसाठीं ? कोणीच कसा मदतीचा हात पुढें करीत नाहीं ?"

"देवा !" इतका वेळा गप्प बसलेली सुप्रिया उठून उभी राहिली. "मी करतें मदत आपल्याला."

"सुप्रिये, एवढीशी तूं कुठवर एवढ्यांना पुरी पडणार ?" बुद्धदेव साशंक होऊन म्हणाले.

"आपला आशीर्वाद असल्यावर माझें कार्य यशस्वी कां होणार नाहीं ? देवा, मला आशीर्वाद द्या. मला मार्ग सांपडला आहे." सुप्रिया निश्चयानें म्हणाली.

दुसरा दिवस उजाडला. सामन्तराज जयसेन आपल्या कुटूंबाबियांसह भोजन करीत आपल्या वाड्यांत बसला होता. इतक्यांत सुप्रिया तिथें येऊन उपस्थित झाली. तिला पाहून "सुप्रिया, तूं कशी यावेळीं इथे?" असे आश्चर्योद्गार त्यानें काढले. उत्तरादाखल सुप्रियानें आपल्या हातांतील कटोरा पुढें केला आणि ती म्हणाली, "थोडी [illegible] भिक्षा घाला."



"धनवान अनाथपिण्डकाची एकुलती एक मुलगी ना तूं? अशी भिक्षा मागणें शोभतें का तुला?" जयसेन जरा रागांतच बोलला. "माझ्यासाठीं नाहीं महाराज! दुष्काळग्रस्त दीनदु:खितांसाठीं! आतां दारोदार भिक्षा मागण्याखेरीज उपाय नाहीं उरला म्हणून म्हणते मला धान्य भिक्षा घाला." सुप्रिया शांतपणें म्हणाली.

सामन्तराज शरमिंदा झाला. आपल्या घरांतून पोतेंभर धान्य आणून त्यानें तिच्या हवालीं केलें.

सुप्रिया त्या दिवशीं कटोरा घेऊन श्रावस्तीभर हिंडली. संध्याकाळपर्यंत धान्याच्या राशी सुप्रियानें जमा केल्या. ती थकली होती, पण तिच्या चेहऱ्यावर समाधान, कृतार्थता विलसत होती.

सुप्रियाच्या या नव्या मार्गाची माहिती जेव्हां बुद्धदेवांना समजली तेव्हां ते उद्गारले,

"आतां श्रावस्तीमधील दुष्काळ सरला समजा!"

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें, [illegible] शाखा.

[illegible]
[illegible] ११८०५ [illegible]
[illegible]